। लातूर । वर्ष ३४ वे । अंक १९६ वा । सोमवार, दिनांक २७ ऑक्टोबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## हैदराबाद गॅझेटवरील राज्य सरकारच्या जीआरला स्थगिती देण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** :हैदराबाद गॅझेटबाबत राज्य सरकारने काढलेल्या जीआरला (शासकीय निर्णय) स्थगिती देण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे.

मंगेश ससाणे यांच्यासह राज्यातील ओबीसी संघटनांनी या संदर्भात याचिका दाखल केली होती. मात्र, याचिकेवर तात्काळ सुनावणी घेण्यास नकार देत सुप्रीम कोर्टाने याचिकाकर्त्यांना मुंबई उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला आहे. न्यायमूर्ती विक्रमनाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या पीठासमोर ही सुनावणी झाली.

**नेमके काय घडले?**

राज्य सरकारने २ सप्टेंबर २०२५ रोजी हैदराबाद गॅझेट काढले होते.

या गॅझेटला स्थगिती देण्याच्या मागणीसाठी ओबीसी संघटनांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती.

सोमवारी ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी याचिकाकर्त्यांच्या वतीने बाजू मांडली.

न्यायालयाने याचिकाकर्त्यांना मुंबई उच्च न्यायालयात सविस्तर याचिका दाखल करण्यास सांगितले, जिथे १८ नोव्हेंबरला या संदर्भात सुनावणी होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या परवानगीने ही याचिका मागे घेण्यात आली आहे, ज्यामुळे ती एक प्रकारे फेटाळल्यासारखी झाली आहे.

ओबीसी आरक्षणासंदर्भात हैदराबाद गॅझेटला स्थगिती देण्याची मागणी किंवा जीआरला स्थगिती देण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे फेटाळली आहे.

आता या प्रकरणाची नियमित सुनावणी मुंबई उच्च न्यायालयात होणार आहे. सुप्रीम कोर्टाच्या सल्ल्यानुसार, याचिकाकर्ते आता पुढील कार्यवाहीसाठी मुंबई हायकोर्टात जाणार आहेत आणि १८ नोव्हेंबर रोजी तिथे युक्तिवाद होण्याची शक्यता आहे.

या निर्णयामुळे ओबीसी आरक्षणाच्या संदर्भातील या महत्त्वाच्या विषयावर आता मुंबई उच्च न्यायालयात काय निर्णय होतो, याकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

## सरन्यायाधीश भूषण गवई यांनी उत्तराधिकारी म्हणून न्यायमूर्ती सूर्यकांत यांची केली शिफारस



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** : भारताचे विद्यमान सरन्यायाधीश भूषण गवई यांनी सोमवारी (२७ ऑक्टोबर) केंद्र सरकारला पत्र लिहून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत यांची त्यांचा उत्तराधिकारी म्हणून शिफारस केली. सरकारकडून अधिसूचना निघाल्यानंतर २३ नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीश भूषण गवई आपले पद सोडतील. त्यानंतर न्यायमूर्ती सूर्यकांत भारताचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून पदाभार स्वीकारतील. न्यायमूर्ती सूर्यकांत या पदावर ९ फेब्रुवारी २०२७ पर्यंत राहतील.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सरन्यायाधीश गवई यांनी संबंधित पत्राची प्रत न्यायमूर्ती सूर्यकांत यांनाही दिली. २३ ऑक्टोबर रोजी सरकारने सरन्यायाधीश गवई यांना पत्र लिहून शिफारस पत्र पाठविण्याची विनंती केली होती. निवृत्त होणारे सरन्यायाधीश त्यांच्या उत्तराधिकाऱ्याची शिफारस करण्यासाठी सरकारला पत्र लिहितात, ही आतापर्यंतची परंपरा आहे.

**कोण आहेत न्या. सूर्यकांत?**

न्या. सूर्यकांत यांचा जन्म १० फेब्रुवारी १९६२ रोजी हरियाणातील हिसार येथील एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. १९८१ साली त्यांनी हिसार येथील सरकारी महाविद्यालयातून पदव्युत्तर पदवी संपादन केली. १९८४ मध्ये त्यांनी रोहतक येथील महर्षी दयानंद विद्यापीठातून कायद्याची पदवी प्राप्त केली आणि हिसार येथील जिल्हा न्यायालयात प्रॅक्टिस सुरू केली. त्यानंतर १९८५ मध्ये ते पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात प्रॅक्टिस करण्यासाठी चंदीगडला गेले. तिथे त्यांनी संवैधानिक, सेवा आणि दिवाणी बाबींमध्ये कौशल्य मिळवले.

९ जानेवारी २००४ रोजी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाच्या कायमस्वरूपी न्यायाधीश पदावर त्यांची नियुक्ती झाली. पुढे ५ ऑक्टोबर २०१८ रोजी न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून काम पाहिले. २४ मे २०१९ रोजी त्यांना सर्वोच्च न्यायालयात बढती मिळाली. १२ नोव्हेंबर २०२४ पासून सर्वोच्च न्यायालयाच्या कायदेशीर सेवा समितीचे अध्यक्ष म्हणूनही काम करत आहेत.

न्या. सूर्यकांत यांच्याकडे देशाच्या सर्वोच्च न्यायालयात काम करण्याचा तब्बल दोन दशकांचा अनुभव आहे. कलम ३७० रद्द करणे, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, लोकशाही, भ्रष्टाचार, पर्यावरण आणि लिंग समानता यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर त्यांनी दिलेल्या निकालांचे स्वागत अनेकांनी केलेले आहे.

## लाईटच्या खांबावरील ॲल्युमिनियम विद्युत तारा चोरणारी टोळी जेरबंद

### १० लाख ६७ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई




**लातूर/प्रतिनिधी** : गेल्या काही महिन्यांपासून लातूर जिल्ह्यातील विविध भागांमध्ये लाईटच्या खांबावरील ॲल्युमिनियम धातूच्या विद्युत तारा चोरीच्या घटना घडत होत्या. या संदर्भातील अनेक गुन्हे लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल झाले होते. नमूद गुन्ह्यांचा तपास प्राधान्याने व जलदगतीने करून आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे यांनी सर्व गुन्ह्यांचा सखोल आढावा घेऊन विशेष सूचना व मार्गदर्शन केले होते. या बाबत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, या सूचनांच्या अनुशंगाने अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखालील एक विशेष पथक तयार करण्यात आले होते. हे पथक गोपनीय आणि तांत्रिक माहितीच्या आधारे अज्ञात आरोपींचा शोध घेत होते.

दिनांक २५ रोजी, स्थानिक गुन्हे शाखेला माहिती मिळाली की, लाईटच्या खांबावरील ॲल्युमिनियम विद्युत तारा चोरी करणारे आरोपी लातूर-नांदेड मार्गावर कृषी महाविद्यालय, लातूर समोर पांढऱ्या रंगाच्या छोट्या मालवाहू टेम्पोसह थांबलेले आहेत.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने तत्काळ सापळा रचला. सदर ठिकाणी तपासणी केली असता टेम्पो जवळ चार इसम आढळले. त्यापैकी एक इसम पोलिसांची चाहूल लागताच पसार झाला, तर उर्वरित तिघांना ताब्यात घेण्यात आले.

ताब्यात घेतलेल्या व्यक्तींचे नावे रमेश गोविंद शेलुरे, वय २४ वर्षे, रा. लातूर रोड, ता. चाकूर, जि. लातूर

दत्ता गोविंद शेलुरे, वय ३० वर्षे, रा. लातूर रोड, ता. चाकूर, जि. लातूर

अशोक रामचंद्र मुकटमोरे, वय २८ वर्षे, रा. बसस्थानक जवळ, चाकूर, ता. चाकूर, जि. लातूर तसेच पळून गेलेला आरोपी -

अशोक चंदर मुकटमोरे, वय अंदाजे ३० वर्षे, रा. आरीमोड, ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर (फरार) असे असून ताब्यात घेतलेल्या व्यक्तीकडून वरील टेम्पोची व त्यांच्या ताब्यातील साहित्याची झडती घेतली असता - ॲल्युमिनियम विजेच्या तारेचे बंडल (एकूण वजन २२५ किलोग्रॅम) रोख रक्कम रु. ५,००,०००/- (चोरी केलेल्या तारेची विक्री करून मिळवलेली) मालवाहू टेम्पो (महिंद्रा जितो) किंमत रु. ५,००,०००/- असा एकूण रु. १०,६७,५००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सखोल चौकशीत संबंधितांनी कबुली दिली की, ते चौघेजण गेल्या चार महिन्यांपासून लातूर जिल्ह्यातील विविध ठिकाणांहून विद्युत तारा चोरी करत होते. सदरील व्यक्तीकडून पोलीस ठाण्यांमधील एकूण आठ गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे -

पोलीस ठाणे किनगाव,चाकूर, अहमदपूर,उदगीर ग्रामीण, लातूर ग्रामीण सदर जप्त केलेल्या मुद्देमालासह पुढील तपासासाठी पोलीस ठाणे किनगाव येथे दाखल गुन्ह्यात सादर करण्यात आले असून, फरार आरोपीचा शोध सुरु आहे.

ही कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक प्रमोद देशमुख, पोलीस अंमलदार संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, पाराजी पुठ्ठेवाड, राजेश कंचे, विनोद चलवाड, मोहन सुरवसे, रामलिंग शिंदे, गणेश साठे, शैलेश सुडे व प्रदीप चोपणे यांनी केली आहे

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अचूक माहिती व जलद कारवाईद्वारे चार महिन्यांपासून सुरू असलेल्या विजेच्या तारा चोरीच्या घटनांचा पर्दाफाश करून एकूण आठ गुन्ह्यांची उकल केली आहे. या कारवाईमुळे सार्वजनिक संपत्तीवरील चोरीस आळा बसून जिल्ह्यातील वीज पुरवठा व्यवस्थेवरील धोका मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे.

## सिकंदर वाकरे यांचा चर्मकार समाजातर्फे निलंगा येथे सत्कार



**निलंगा/प्रतिनिधी** : येथे सिकंदर पुंडलिकराव वाकरे महानगर पालिका अग्नीशमन दल अहिल्यानगर यांची राष्ट्रीय चर्मकार महासंघ अहिल्यानगर च्या जिल्हा सहसचिव पदी निवड झाल्यामुळे त्यांचा चर्मकार समाजाच्या वतीने भव्य सत्कार निलंगा येथे करण्यांत आला. या सत्काराच्या कार्यक्रमासाठी प्रसिध्द कवी तथा चर्मकारी संघाचे तालुका अध्यक्ष माधव तुकाराम लांडगे तसेच उमेश बोरुळे तालुका. अध्यक्ष चर्मकार महासंघ भालकी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमासाठी खरोसा येथील नवभारत विद्यालय खरोसा येथील वरिष्ठ सहाययक नवखंडे संदीपान शिवाजीराव श्री शिवाजी विद्यालय निलंगा येथील प्रयोगशाळा सहाय्यक अविनाश नवखंडे तसेच आकाश नवखंडे व त्यांचा मित्र परिवार उपस्थित होता. प्रसिध्द कवी लांडगे यांनी लिहलेले रविदास यांचे आमृतवाणी पुस्तक देऊन सर्वाचा यथोचित सत्कार करण्यांत आला.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**अरबी समुद्रात कमी पट्ट्यामुळे राज्यात अनेक भागात पाऊस...**

### चिमटा दयाचा



**लातूरच्या रस्त्यावर वाहतूक कोंडीचा प्रश्न कायम आहे ! यात सुधारणा होईल याची शाश्वती कमी आहे ! !**

## शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांमध्ये धैर्य, शारीरिक क्षमता निर्माण करावी- राज्यपाल हरिभाऊ बागडे

### ➜ शिरूर अनंतपाळ येथे प्रभाकर कुलकर्णी गुरुजी यांचा जीवनगौरव सोहळा

### ➜ 'असा एक प्रभाकर' या गौरव ग्रंथाचे प्रकाशन



**लातूर/प्रतिनिधी** : शिक्षण हेच गरिबी दूर करण्याचे साधन आहे. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांमध्ये धैर्य, शारीरिक क्षमता निर्माण होण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी केले. शिरूर अनंतपाळ येथील मोरया लॉन्स येथे आयोजित कर्मयोगी प्रभाकर कुलकर्णी गुरुजी जीवनगौरव सोहळ्यामध्ये ते बोलत होते.

खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार विक्रम काळे, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, माजी खासदार रुपाताई पाटील निलंगेकर, शिरूर अनंतपाळ नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष चंद्रकला शिवणे, विवेक देशपांडे, ड. संभाजी पाटील यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रभाकर कुलकर्णी गुरुजी व सुमन प्रभाकर कुलकर्णी यांचा सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह देवून गौरव करण्यात आला. तसेच प्रभाकर कुलकर्णी यांच्या जीवनावर आधारित 'असा एक प्रभाकर' या गौरव ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

प्रभाकर कुलकर्णी यांनी निस्पृह भावनेतून विद्यार्थ्यांना आणि समाजाला दिशा देण्याचे काम केले. त्यांचे शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील योगदान मोठे आहे. समाजासाठी त्यांनी केलेल्या कार्यातून उतराई होण्यासाठी त्यांचा जीवनगौरव सोहळा होत आहे. त्यांचे विचार आत्मसात करण्याचा प्रयत्न प्रत्येकाने करावा, असे राज्यपाल श्री. बागडे यावेळी म्हणाले.

मुलांना शालेय जीवनातच योग्य शिक्षण आणि योग्य संस्कार मिळाले तर त्यांची वाटचाल योग्य मार्गाने होते. त्यामुळे आपला विद्यार्थी जीवनात यशस्वी व्हावा, यासाठी शिक्षकांनी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे, असे राज्यपाल श्री. बागडे यांनी सांगितले. भारतीयांकडे असलेल्या पारंपारिक ज्ञानाची ओळखही विद्यार्थ्यांना होण्याची गरज आहे. याबाबतची माहितीही त्यांना शालेय जीवनातच दिली जाणे आवश्यक आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या समृद्ध परंपरेचे महती समजण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले. जीवनात यशस्वी होण्यासाठी सकारात्मक दृष्टीकोन महत्वाचा आहे. कोणत्याही कामाला कमी न समजता प्रत्येक जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडण्याची मानसिकता विद्यार्थ्यांमध्ये तयार व्हायला हवी. अगदी छोट्या कामापासून सुरूवात करून उच्च पदांवर पोहचलेल्या व्यक्तींची अनेक उदाहरणे आपल्या समोर आहेत. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले.

सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या प्रभाकर कुलकर्णी यांनी सुसंस्कृत पिढी घडविण्याचे कार्य केले, असे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी सांगितले.

शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात काम करताना प्रभाकर कुलकर्णी यांनी कधीही तत्वाशी तडजोड केली नाही. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे आमदार विक्रम काळे म्हणाले.

पुढील पिढीला योग्य दिशा देण्याचे महत्वपूर्ण काम प्रभाकर कुलकर्णी यांनी केल्याचे आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी सांगितले.

माजी खासदार रुपाताई पाटील निलंगेकर, विवेक देशपांडे, ड. संभाजी पाटील यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

सत्काराला उत्तर देताना प्रभाकर कुलकर्णी यांनी आपला जीवनपट आणि शिरूर अनंतपाळ गावाचा इतिहास उलगडला. तसेच या परिसरातील विद्यार्थी, नागरिकांमुळे आपल्या हातून चांगले कार्य घडू शकले, असे त्यांनी सांगितले.

जीवनगौरव सोहळ्यामध्ये श्री. कुलकर्णी यांना देण्यात आलेल्या सन्मानपत्राचे वाचन साहित्यिक धनंजय गुडसुरकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिरूर अनंतपाळ येथील साहित्य व संस्कृती संवर्धन मंडळाचे अध्यक्ष बालाजी येरोळे यांनी, तर सूत्रसंचालन किरण कोरे यांनी केले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## स्वावलंबन व स्वदेशीच्या विचाराची गरज

अमेरिका भारताला आर्थिक आडचणीत आणत आहे. काही बेलगाम कर आकरून आर्थिक कोंडी करीत आहेत. त्यामुळे भारतीयांनी आता जगातील घडामोडीचा विचार करून वाटचाल करावी लागेल. अमेरिकेत ट्रम्प यांची कार्यप्रणाली सुरु झाल्यापासून जगात ज्याकाही घटना घडत आहेत याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. ट्रम्प यांनी वाटेल ते कोणावरही निर्बंध लादत आहेत. त्याच प्रमाणे टैरिफ आकार हा मर्यादेपेक्षा अधिक आकारण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. यापेक्षा दुसऱ्या देशातील काही अंतर्गत बाबीमध्ये ढवळाढवळ करीत आहेत. त्यामुळे जगाची डोकेदुखी ठरत आहे. कोणावरही काही ही निर्बंधाची घोषणा करणे यापुरते त्यांचे पावुल नाहीत तर आम्ही युद्ध रोखले असे बालिश वक्तव्य करीत आहेत. या देशादरम्यान, त्या देशा दरम्यान युद्ध रोखणे हे काही सोपे काम नाही. दोघामधील अंतर्गत बाब असताना आम्ही रोखले असे म्हणणे योग्य नाही. मुळात ट्रम्प यांनी अमेरिका अंतर्गत बाबीकडे लक्ष दिले पाहिजे. भारताने रशियाकडून तेल खरेदी करू नये असे ट्रम्प सांगणारे कोण आहेत? भारत आपल्यादेशांतर्गत निर्णय घेण्यात सक्षम आहे. इतराची मध्यस्थी नको. कारण भारताला पाकिस्तानचा त्रास आहे. तो पलगाममध्ये हिंसा घडऊ शकतो. त्यावेळी अमेरिकेने पाकिस्तानला का खडसावले नाही. त्यावेळी गप्प होते. पहलगाममधील घटनेनंतर भारताने ऑपरेशन सिंदुर यशस्वी कारवाई केली याचा परिणाम पाकिस्तान गप्प झाला. पाकव्याप्त भागात हवाई हल्ला केला. महिला सैनिकांनी पाकला पाणी पाजले. जर पुरूष सैन्य दलाने कारवाई केली असतीत तर पाकिस्तान जगाच्या नकाशावरून दिसला नसता. त्यामुळे भारत आणि पाकिस्तान या दोघामधील अंतर्गत समस्या आहे तो मी सोडविली असे मत व्यक्त करणे अतिषय बालीशपनाचे आहे. त्यामुळे रशिया हा भारताचा जुना मित्र आहे. माजी पंतप्रधान इंदिराजी गांधी यांच्या काळापासून घट्ट संबंध आले आहेत ते आजही चालू आहे. तेल खरेदी करण्याचा नवा व्यवहार नाही तर तो जुना आहे. त्यामुळे भारताने तेल खरेदी करू नये असे सांगणारा अमेरिका कोण आहे. त्यामुळे कारण नसताना अमेरिका दबाव आणून संबंध बिघडावीत आहे. भारतात लोकशाही आहे. अशा लोकशाहीत सत्ताधारी व विरोधक मिळून राष्ट्रासाठी निर्णय घेत असतात. तरी भारताची भुमिका मवाळ आहे. भारत पाकिस्तानाला अंतरावर रोखले आहे. पुर्वीच्या सरकारपेक्षा सत्ताधाऱ्यांनी खणखर भुमिका घेतली आहे. त्यामुळे आज देशात सतत होणारे बॉम्बस्फोट बंद झाले आहेत. घुसखोरी कमी झाली आहे. ३७० कलम हटविल्यानंतर जम्मूकाश्मीरात पुर्ववत परिस्थिती निर्माण होत आहे. अशा स्थितीत भारतीय घडामोडीत अमेरिकेच्या विचाराची घुसखोरी कांही कामाची नाही. मुळात भारताची अपेक्षा असेल त्यांच्याकडून तेल खरेदी करेल. अमेरिकेचा दबाब काही कामाचा नाही. अशा परिस्थितीत एक बाब लक्षात घेतली पाहिजे, भारतीयांनी स्वावलंबन व स्वदेशीचा विचार रुजवावा लागेल. काही झाले तरी यापुढे स्वदेशी मालाविषयक विचार सतत डोळ्यासमोर ठेवले पाहिजेत. मुळात स्वदेशी व स्वावलंबामुळे देशाला स्वराज्य मिळाले. महात्मा गांधींजी यांनी जे विचार मांडले त्याचा अमल होणे अपेक्षित आहे. ग्रामीण भागातील उद्योगांना चालना दिली पाहिजे. जो पर्यंत सक्तीने स्वदेशी मालावर प्रेम करणार नाही. वापरणार नाहीत, तो पर्यंत राष्ट्रप्रेम जागृत होणार नाही तो पर्यंत भारताचे दुष्मण राष्ट्र घाबरणार नाहीत. त्यामुळे भारतीय मालावर प्रेम केले पाहिजे. जपान व जर्मनमध्ये मोठा जाड तांदळाचा भात खातात, त्यावेळी भारतात तयार होणार बासमती अन्य बारीक चांगला प्रतीचा तांदुळ मागवा असा सल्ला दिला. त्यावेळी जपान, जर्मनमधील नागरिक म्हणाले, आमचा देशात जो शेतकरी पिकवितो तोच आम्ही खातो. कारण आमच्या देशात शेतकरी पिकवितात तेच आम्ही खाल्ले तरच आमच्या शेतकऱ्याच्या हाती पैसा जाईल, बाहेरच्या देशातून मागविणे म्हणजे आमच्या देशातील शेतकऱ्या आर्थिकदृष्टिने कमकुवत करणे असा आहे. त्यामुळे आजही जपान किंवा जर्मनीतील लोक आपल्या देशातील शेतीत जे पिकविले जाते तेच खातात, याला म्हणतात राष्ट्रप्रेम! मुळात काही देश असे आहेत की, आपल्या देशात जे उत्पादित होते त्याचाच वापर करतात. परदेशीय मालाचा वापर अतिषश कमी केला जातो. आपणही भारतीय बनावटीच्या मालावर प्रेम केले पाहिजे. स्वावलंबन व स्वदेशीचा नारा देऊन त्याचा अमल केला पाहिजे. भारतीय बनावटीचे कपडे असोत किंवा अन्य वस्तू वापरल्या पाहिजेत. मुळात भारतीयांत परदेशीय मालाची आवड मोठी आहे. चायनीज माल मोठ्या प्रमाणात भारतीयच बाजारपेठ आहे. अनेक चीनी मालाची भारतीय खरेदी करतात. त्याच प्रमाणे स्वदेशी मालाचा वापर कमी होतो. हे योग्य नाही. स्वदेशी मालासाठी बलिदान देणारे बाबू गेणू यांना विसरू शकत नाही. स्वराज्य व स्वदेशीचा नारा देणारे लोकमान्य टिळकांना विसरू शकत नाही. मुळात जर अमेरिका असोत किंवा भारताचे शत्रु राष्ट्र समजले जातात त्यांना जर वटणीवर आणावयाचे झाले तर स्वावलंबन व स्वदेशी मालाचा विचार करावा लागेल. त्याचा आवलंब करावा लागेल. तरच देशात समाधानाचे वातावरण निर्माण होईल. भारतीयांच्या हाताला काम मिळेल. नसता काय होईल बेकारी मोठ्या प्रमाणात वाढून नवीन समस्या निर्माण होईल. आज ट्रम्प काही तरी अशांतता निर्माण करण्याचा जो प्रयत्न करीत आहेत. त्याला काही प्रमाणात लगाम लागेल. पन्नासटक्के टैरिफ लादणे म्हणजे भारतीयांची आर्थिक पिळवणुक करणे सारखे आहे. या बाबत विचार भारतीयांनी करून यापुढे स्वदेशी मालावर प्रेम कर व स्वदेशी मालाचा वापर करा. कुटीर उद्योगाला चालना दिली पाहीजे. कुटीर उद्योगाला चालना म्हणजे ग्रामीण भागात आर्थिक विकास साधण्यासारखा आहे. खेडी ही आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासारखे आहे. स्वावलंबन किंवा स्वदेशीचा नारा हा नवीन नाही. जुनाच आहे जो काही मध्यतरी विसरला गेला होता. त्यामुळे परत एकदा स्वदेशी व स्वावलंब हा विचार जीवनात उतरावा लागेल.

## माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत मळवटी येथील ट्वेंटीवन शुगरच्या ५ व्या गळीत हंगामाचे बॉयलर अग्निप्रदीपन






**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख आणि ट्वेंटीवन ॲग्री लिमिटेडच्या संचालिका सौ. अदितीताई अमित देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी लातूर तालुक्यातील मळवटी येथील ट्वेंटीवन शुगरच्या ५ व्या गळीत हंगामाचे बॉयलर अग्निप्रदीपन करण्यात आले.

माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांचे चिरंजीव अवीर अमित देशमुख यांच्या हस्ते विधिवत बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा पार पडला. यावेळी प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते कारखाना स्थळी वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी बोलतांना माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले, अत्यंत अद्यावत यंत्रसामुग्रीच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या ट्वेंटीवन शुगर्सने आता ऊस तोडणीतही यांत्रिकीकरण आणले आहे, यातून शेतकऱ्यांच्या मुलांसाठी रोजगारही उपलब्ध झाला आहे. कमीत कमी खर्चात अधिकाधिक उत्पादन घेऊन शेतकऱ्यांच्या कष्टाला अधिकचा मोबदला मिळावा असा प्रयत्न सुरू आहे असे सांगीतले.

पूढे बोलतांना ते म्हणाले, मागच्या गळीत हंगामातील गाळप ऊसाला ट्वेंटीवन शुगर्सने अंतीम ऊसदर प्रतिटन ३००१ रुपये एवढा विक्रमी भाव दिला आहे. लवकरच सुरुवात होत असलेल्या आगामी गळीत हंगामात मांजरा परिवाराने जाहीर केलेल्या संकल्पानुसार शेतकऱ्यांच्या ऊसाला प्रतिटन ३१५१ रुपये भाव देण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आपण सर्वांना जिद्दीने प्रयत्न करावयाचे आहेत. यातून परिसरातील शेतकरी, शेतमजूर कामगार या सर्वांच्या जीवनात समृद्धी, स्थैर्य आणि आनंद निर्माण होईल हा विश्वास आहे.

या सोहळ्यास ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, जनरल मॅनेजर संतोष बिरादार, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, ऋषिकेश पाटील, राजकुमार पाटील, बळवंत पाटील, शंकर बोळंगे आदींसह सर्व खातेप्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मांजरा परिवाराप्रमाणे ट्वेंटीवन शुगर्स लि., गाळप झालेल्या सभासद व ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उसाला गळीत हंगाम सन २४-२५ करीता विक्रमी ऊसदर देत आहे. मागील गळीत हंगामात ट्वेंटीवन शुगर्सकडून गाळप झालेल्या उसाला ३००१/- रु. प्रति टन प्रमाणे ऊस दर देण्यात आलेला आहे. गळीत हंगाम २४-२५ मध्ये गाळप झालेल्या या ऊसाची अंतिम राहिलेली ऊस बिलाची रक्कम कारखानाकडून दिवाळी पाडवाच्या शुभमुहूर्तावर गटनिहाय ऊस उत्पादकांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे, अशी माहिती कारखान्याच्या वतीने देण्यात आली. मांजरा परीवाराप्रमाणे येणाऱ्या हंगामातही गाळप झालेल्या ऊसाला ऊसदर अदा करण्यात येणार आहे. त्यामुळे जास्तीत सभासद व ऊसउत्पादकांनी आपला ऊस येणाऱ्या गळीत हंगामात ट्वेंटीवन शुगर्स लि.,ला गाळपास दयावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी मेळावा



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२२ ऑक्टोंबर २०२५ रोजी माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आलेला होता.या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे होते.याप्रसंगी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचचे न्यायमूर्ती शिवकुमार डिगे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,डॉ.युवराज सारणीकर,माजी विद्यार्थी फाऊंडेशनचे अध्यक्ष उमाकांत अग्रे,उपाध्यक्ष हणमंत गायकवाड,पुंडलिक इंगळे,सचिव संजय ढाले,कोषाध्यक्ष विजय किलचे,सतीश नरहरे,प्रा.बळवंत सूर्यवंशी,अनंत कासारखेडकर,सुशीलकुमार फुलारी,इस्ताळकर,पाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.बळवंत सूर्यवंशी यांनी केले.यावेळी पदवी व पदव्युत्तर विषयातील विविध क्षेत्रात कार्यरत असणारे माजी विद्यार्थी मेळाव्याच्या निमित्ताने एकत्र आलेले होते.त्यात प्रामुख्याने न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांनी दयानंद विज्ञान महाविद्यालयाशी आमचे अतूट असे नाते आहे,अशा भावना व्यक्त केल्या.महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांच्यासमवेत सर्व माजी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयांमध्ये स्वागत केले.

मेळाव्यानंतर दयानंद विज्ञान माजी विद्यार्थी फाऊंडेशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांची बैठक झाली.या बैठकीमध्ये दयानंद शिक्षण संस्था,महाविद्यालय व विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने कार्य करत राहण्याचा निर्धार केला व काही निर्णयही घेतले.त्यात विविध विषयांचा आधार घेण्यात आला.पुढील वर्षभरात फाऊंडेशनमार्फत महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध योजना यावरही सखोल चर्चा करण्यात आली व विद्यार्थी हिताच्या दृष्टीने ठोस निर्णयही घेण्यात आले तसेच पुणे येथे इंजिनिअरिंगचे शिक्षण घेणारा वामन राठोड आणि सूर्यवंशी ओंमकार विजय या दोन विद्यार्थ्यांच्या संपूर्ण शिक्षणाची, पुढील इंजिनिअरिंगचा खर्च दयानंद विज्ञान माजी फाऊंडेशन मार्फत उचलण्याचा निर्धार करण्यात आला व त्यांना पहिल्या वर्षाची फिस व इतर खर्च म्हणून एकूण एक लाख रुपयाचा चेकही देण्यात आला.

## सतर्कता अभियान; सतर्कता आपली सामायिक जबाबदारी अंतर्गत तपास सेमिनार संपन्न




**मुंबई/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेने सतर्कता अभियानाच्या अंतर्गत तपास आणि अहवाल लेखन व चार्जशीट तयार करणे या विषयावर सेमिनार आयोजित केले सतर्कता अभियान सतर्कता: आपली सामायिक जबाबदारी अंतर्गत, मध्य रेल्वेच्या सतर्कता संघटनेने आपल्या क्षमता वाढीच्या कार्यक्रमाच्या अंतर्गत २४.१०.२०२५ रोजी तपास आणि अहवाल लेखन व चार्जशीट तयार करणे या विषयावर सेमिनार आयोजित केले, जे मध्य रेल्वे मुख्यालय, मुंबई येथे पार पडले.

सेमिनारचा उद्देश अधिकारी योग्य, सुव्यवस्थित आणि संपूर्ण चार्जशीट तयार करण्याच्या कौशल्यांना बळकटी देणे हा होता. हे सत्र श्री अजोय कुमार शर्मा, संयुक्त संचालक (सतर्कता), रेल्वे बोर्ड यांनी सादर केले, ज्यात त्यांनी तपास पद्धती, प्रभावी अहवाल लेखन, व्यवस्थित चार्जशीट तयार करणे आणि चार्जशीट तयार करताना टाळाव्यात अशा सामान्य चुका याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन केले.

आपल्या व्याख्यानात श्री अजोय कुमार शर्मा यांनी प्रशासनिक प्रथांमध्ये पारदर्शकता, निष्पक्षता आणि जबाबदारी सुनिश्रि्चत करण्यासाठी परिश्रम, अचूकता आणि सतर्कता तत्त्वांचे पालन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या सत्रामुळे सहभागी अधिकाऱ्यांना सतर्कतेशी संबंधित प्रक्रियांमध्ये प्रामाणिकपणा राखण्याच्या व्यावहारिक दृष्टिकोनाची सखोल समज मिळाली.

मध्य रेल्वेच्या विविध विभागांतील अधिकाऱ्यांनी सेमिनारमध्ये सक्रियपणे भाग घेतला. इंटरॅक्टिव चर्चांद्वारे आणि वास्तविक प्रकरणांचे उदाहरणे पाहून त्यांनी सतर्कता तपासणी आणि दस्तऐवजीकरणाच्या गुणवत्तेची व परिणामकारकतेची वाढ करण्याबाबत मौल्यवान माहिती मिळवली. हे सेमिनार १८ ऑगस्ट २०२५ ते १७ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत चालणाऱ्या तीन महिन्यांच्या सतर्कता जागरूकता अभियानाच्या अंतर्गत आयोजित जागरूकता कार्यक्रम व कार्यशाळा यांच्या मालिकेचा भाग आहे, ज्याचा उद्देश संघटनेतील सर्व स्तरांवर नैतिक आचरण, जबाबदारी आणि सतर्कतेची जागरूकता वाढवणे हा आहे.

## सलग तीन दिवस फक्त फळे खालल्यास शरीरावर काय परिणाम होतात

आपल्यापैकी अनेक लोक हे डिटॉक करण्यास प्राधान्य देतात. त्यामागे एकच कारण असतं आणि ते म्हणजे वजन कमी करणं. कारण आपण इतकं खातो की आपलं वजन वाढू लागतं. अशात आपण रोज नियंत्रणात खातो, पण एखाद्या दिवशी आपण इतकं काही खातो की एकवेळचं जेवण आपण स्किप करतो आणि त्याला डिटॉक्स असं म्हणतात. जेणेकरून आपण जे आधी खाल्ल आहे ते पचेल आणि त्यासोबत आपण वजन नियंत्रणात येईल. डिटॉक्स ही एक प्रक्रिया असून त्यातही अनेक प्रकार आहेत. सध्या सगळ्यात लोकप्रिय असलेला प्रकार म्हणजे ७२ तास फास्टिंग. यात फक्त फळांचे सेवन करण्यात येते. याला फ्रुटेरियन डायट असं देखील म्हणतात. फ्रुटेरियन डायट केल्यानं तुमच्या शरीरातील सगळ्या गोष्टी नियंत्रणात येतील. त्यासोबतच तुमच्या शरिराला आवश्यक असलेले सगळेचं व्हिटामिन, मिनरल्स, ॲन्टिऑक्सिडंटस मिळतील असं सगळ्यांना वाटतं. दरम्यान, सूरूदहंब्हरूली या इन्स्टाग्राम पेजवरून एक माहिती समोर आली असून असं आपण केल्याल आपल्या आरोग्यावर काय परिणाम होऊ शकतो हे जाणून घेऊया.

काय आहेत फायदे

१२ तासात तुमची पचन प्रक्रिया चांगली होते. तुमचं शरीर ते जे काही फळं खातंय त्याचं सगळे न्युट्रिएन्ट पूर्णपणे घेण्यास मदत करतं. तर त्यात असलेले डायट्री फायबर हे पोट दुखीपासून अनेक पोटांच्या आजारांपासून हळू हळू आपली सुटका करू लागतं. २४ तासानंतर तुमच्या शरीरातील फॅट कमी होऊ लागतात. अशात तुमचं शरीर हे तुमची एनर्जी वाढवण्यासाठी शरीरातील फॅटस वापरू लागतं.

फक्त फळं खाल्यास काय वाईट परिणाम होतो

वजन वाढणं

अनेकांचं वजन हे कमी होऊ शकतं पण फळांमध्ये नॅच्युरल सारख असते त्यामुळे वजन वाढण्याची शक्यता असते. त्यातही तुम्ही खूप वेळ फक्त फळांचे सेवन केले तर.

मधुमेहाची चिंता- मधुमेह असणाऱ्या व्यक्तींनी ७२ तास फळांवर राहणे टाळायला हवे. कारण फळांमध्ये साखरेचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे रक्तातील साखरेच्या पातळीवर परिणाम होऊ शकतो. किडनीचे विकार असलेल्यांनाही धोका निर्माण होऊ शकतो. वजय कमी होत नाही - बरेच लोक हे सगळच्या नाश्त्याला फळं खाण्यास प्राधान्य देतात. काही लोक तर जेवणात देखील फक्त फळं खातात कारण त्याना वजन कमी करायचं असतं. आरोग्यदायी पर्याय असूनही, फळांचे जास्त सेवन केल्यानं शरीरातील कार्बो हायड्रेट वाढल्यामुळे वजन कमी होत नाही.

गोड खाण्याची इच्छा

सतत फळं खाल्यानं तुमची गोड खाण्याची इच्छा सतत वाढू शकते.

## त्वचेवर नैसर्गिक ग्लो हवा असेल तर या पदार्थांचा आहारात समावेश करा; हेल्दी त्वचेसाठी रामबाण उपाय

प्रदूषण, अनहेल्दी आहार, बिघडलेली जीवनशैली अशा अनेक कारणांमुळे आपल्या त्वचेचा ग्लो कमी होऊ लागतो. या सगळ्याशिवाय हिवाळ्याची कोरडी हवा आपली त्वचा अधिक कोरडी आणि निर्जीव बनवते. त्यामुळे आपण आपल्या त्वचेची काळजी घेणं महत्त्वाचं आहे. त्वचेच्या काळजीमध्ये आहार खूप महत्त्वाची भूमिका बजावतो. काही खाद्यपदार्थ आहेत ज्यांचा आहारात समावेश केल्याने तुमच्या त्वचेला नैसर्गिक ग्लो येऊ शकतो. चला जाणून घेऊयात कोणत्या खाद्यपदार्थांमुळे तुमची त्वचा ग्लोईंग होऊ शकते.

बीट - ही लाल रंगाची भाजी तुमचे गाल नैसर्गिकरित्या गुलाबी बनवू शकते आणि तुमची त्वचा सुधारू शकते. बीटमध्ये भरपूर प्रमाणात अँटी-ऑक्सिडेंट असतात, जे त्वचेला फ्री रॅडिकलसच्या नुकसानीपासून वाचवतात. हे रक्त शुद्ध करण्यास देखील मदत करते, ज्यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात आणि मुरुमांची समस्या कमी होते.

बदाम -बदामामध्ये असे अनेक पोषक घटक आढळतात, जे त्वचेला चमकदार बनवण्यास मदत करतात. व्हिटॅमिन ई बदामामध्ये आढळते, जे सुरकुत्या आणि काळे डाग कमी करण्यास मदत करते. त्यात अँटी-ऑक्सिडंट्स आणि फॅटी ॲसिड देखील आढळतात, जे त्वचेला फ्री रॅडिकल्सच्या नुकसानीपासून वाचवतात आणि त्वचेची आर्द्रता लॉक करण्यात मदत करतात.

बेरी - बेरीमध्ये अँटी-ऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात आढळतात, जे त्वचेला तेजस्वी बनवण्यासाठी फायदेशीर असतात. ते कोलेजन तयार करण्यास देखील मदत करतात, ज्यामुळे सुरकुत्या आणि बारीक रेषा यांसारख्या वृद्धत्वाच्या समस्या कमी होतात. अँटी-ऑक्सिडंट्स फ्री रॅडिकल डॅमेज आणि डार्क स्पॉट्स कमी करण्यासाठी फायदेशीर आहेत.

गाजर - गाजरमध्ये व्हिटॅमिन ए आढळते, जे नवीन पेशी तयार करण्यासाठी आणि जुन्या पेशी काढून टाकण्यासाठी आवश्यक आहे. हे कोलेजन तयार करण्यास देखील मदत करते, ज्यामुळे वृद्धत्वाची समस्या कमी होते आणि त्वचा चमकते. गाजर त्वचेचा कोरडेपणा कमी करण्यास मदत करते आणि मुरुमांपासून बचाव करते.

लिंबूवर्गीय फळे - संत्री, लिंबू इत्यादी लिंबूवर्गीय फळांमध्ये व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. तळींराळप-उ त्वचेचे ऑक्सिडेटिव्ह नुकसान होण्यापासून संरक्षण करते. याव्यतिरिक्त, अँटी-ऑक्सिडंट्सच्या उपस्थितीमुळे, ते आपली त्वचा उजळ करण्यास, नवीन पेशी निर्माण करण्यास आणि मुक्त रॅडिकल्सच्या नुकसानापासून संरक्षण करण्यास मदत करतात.

## राजा-महाराज हिवाळ्यात काय खायचे शाकाहारी की मांसाहारी.. जाणून घ्या काय आवडायचे

हिवाळा हा खाद्यपदार्थांच्या दृष्टिकोनातून खूप महत्त्वाचा महिना मानला जातो. थंडीपासून बचाव करण्यासाठी वेगवेगळ्या भागात लाडूंसह असे अनेक पदार्थ तयार केले जातात, ज्यामुळे आरोग्य तर चांगले राहतेच शिवाय थंडीपासून संरक्षण होते आणि ताकद मिळते. थंडीमध्ये आरोग्याची विशेष काळजी घ्यायला हवी. श्रीमंतांपासून ते सर्वसामान्यांपर्यंत सर्वांच्या खाण्याच्या सवयी हिवाळ्यात बदलतात. महत्त्वाच म्हणजे हे आजपासून नाही तर प्राचीन काळापासून होत आहे. अशा परिस्थितीत राजा-महाराजांनी हिवाळ्यात कोणते विशेष अन्न किंवा पदार्थ खाल्ले ते जाणून घेऊया.

इतिहासकारांनी दिलेल्या माहितीनुसार, राजे-सम्राटही आरोग्यासाठी चांगले मानले जाणारे पदार्थांचा आहारात समावेश करत. फरक एवढाच की, गुणवत्तेत कोणतीही तडजोड नव्हती. ते सर्वोत्तम होते. इतर गोष्टींप्रमाणेच त्यांचे जेवणही चैनीचे होते. प्रत्येकाच्या आवडीनिवडी सारख्याच होत्या असे नाही, पण हिवाळ्याच्या मोसमात त्यांचे खाद्यपदार्थ पूर्णपणे परिसराशी संबंधित होते. पूर्वी साधनसामग्री कमी होती त्यामुळे वस्तू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठी बराच वेळ लागत असे. त्यामुळे स्थानिक गोष्टींचाच वापर करण्यावर भर दिला जात होता. अशावेळी जे पिकायचं त्याच आहाराकडे भर दिला जातो.


बाजरीच्या खिचडीवर अधिक भर

शेखावती येथील इतिहासकार महावीर पुरोहित सांगतात की, हिवाळ्याच्या काळात राजा महाराजांनी खास शाकाहारी पाककृतीतून बनवलेल्या गोंड आणि मेथीच्या लाडूंसोबत बाजरीपासून बनवलेल्या खिचडीवरही विशेष भर दिला. त्याचा प्रभाव गरम आहे. त्यामुळे थंड वातावरणात शरीराला आतून उष्णता मिळावी यासाठी बाजरीचा वापर करत. बाजरी राजस्थानमध्ये मुबलक प्रमाणात आढळतात. त्यासाठी बाजरीच्या बिया पाण्यात भिजवल्या. या खिचडीमध्ये शुद्ध पिवळे गाईचे तूप घालण्यात आले. शाही स्वयंपाकघरातील आचारी ही खिचडी खास पद्धतीने बनवत असत.

हिवाळ्यात केशर मिसळून गरम दूध

बहुतेक राजे-महाराजांबद्दल असे म्हटले जाते की, ते हिवाळ्यात केशर मिसळलेले गरम दूध प्यायचे. केशर शक्तिवर्धक आहे. हिवाळ्यात, मांसाहारी लोकांमध्ये, तीतर, हरीण आणि रानडुकरांच्या मांसाला प्राधान्य दिले जाते. त्यांचा स्वभावही उष्ण असतो. आज तितर आणि हरणांच्या शिकारीवर बंदी असली तरी पूर्वी तशी नव्हती.

# सडकी मानसिकता



महासत्तेचा प्रमुख अविश्वसनीय दावे करतो आणि ते दावे परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांकडून साधार फेटाळले जातात, यात अमेरिकेचे हसे होत आहे. तेथील सुजाण नागरिकांना ते भान आहे. निदर्शने याच आत्मभानाचे उदाहरण होय.रस्त्यावर उतरलेल्या लाखो निदर्शकांवर विमानातून चिखलफेक केली जात असल्याचा व्हिडिओ डोनाल्ड ट्रम्प यांनी एआयद्वारे स्वतः तयार केला. आपल्याच देशातील विरोधी मताच्या नागरिकांबद्दल ही सडकी मानसिकता असेल तर काय बोलणार? लबाडी, उर्मटपणा, खोटारडेपणा याचा अर्क असलेली व्यक्ती अमेरिकेच्या अध्यक्षपदी आहे. त्यांच्या कारवायांमुळे 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' प्रत्यक्षात येण्याची अजिबात शक्यता नाही, उलट अमेरिकेसह संपूर्ण जगासमोर कोणते संकट उभे राहील ते सांगता येत नाही. शांततेचे हिंटिंम पिटत ही व्यक्ती जगाला तिसऱ्या महायुद्धाच्या दिशेने घेऊन चालली आहे. तथाकथित भ्रष्ट राजवटींसंदर्भात अमेरिकास्थित संस्थांचे नाकाने कांदे सोलणारे अहवाल प्रसिद्ध होत असतात. आज अमेरिकेच्या अध्यक्षांच्या 'कर्तृत्वा'च्या गाथा बाहेर येत असताना अशा अहवालात अमेरिकेचा उल्लेख कशा प्रकारे राहील, याची उत्सुकता आहे! या हुकूमशहाला रोखण्यासाठी अमेरिकेतील नागरिक दुसयांदा रस्त्यावर उतरले. अडीच हजाराहून अधिक ठिकाणी जोरदार निदर्शने झाली. 'नो किंग' ही ट्रम्प यांच्या विरोधातील आंदोलनाची मध्यवर्ती संकल्पना होती. याच कल्पनेतून अमेरिकेत ब्रिटनला विरोध झाला आणि लोकशाही देश म्हणून अमेरिकेचा उदय झाला, याआधी बाराशे ठिकाणी ट्रम्प यांच्याविरोधात आंदोलन झाले होते. ट्रम्प यांनी आंदोलनाची खिल्ली उडवली असली तरी या गृहस्थांकडून अमेरिकेचे कल्याण होण्याची सुतराम शक्यता नाही, हे एव्हाना अमेरिकेलाही कळून चुकले आहे. 'हेट अमेरिका अगेन रैली' असे ट्रम्प यांच्या बगलबच्च्यांनी या आंदोलनाचे वर्णन केले असले तरी ते ट्रम्प यांच्या मूर्खपणाचे समर्थन आणखी किती काळ करू शकतील? हा प्रश्नच आहे. अगदी आतापर्यंत ट्रम्प यांच्या विसंगत वर्तनाला हसण्यावारी नेले जाण्याचे चित्र दिसत आहे. मूल्यमापनातील ही चूक अथवा ट्रम्प यांच्या कर्तनातून निर्माण होणारे धोके लक्षात न घेण्याचा दृष्टीकोन नजिकच्या काळात मोठी किंमत बुकविण्यास भाग पाडू शकतो. कुठलाही आधार नसताना भरभक्कम दावे करणे, ही मानसिक रोगाधी अवस्था म्हणाती लागेल. ट्रम्प यांच्या बाबतीत हा आजार टीकाला मेला आहे.

**एकच सत्ताकेंद्र धोक्याचे**

इजिप्तमध्ये त्यांच्या पुढाकाराने कथित शांतता करार झाला. या करारावर ना इसायलची स्वाक्षरी आहे, ना हमासचे प्रतिनिधी त्या परिषदेतला उपस्थित होते. तरीही आपण 'शांतीदूत' असल्याचा तोरा ट्रम्प यांनी मिरवला, या धडधडीत खोटेपणाबद्दल त्यांना जाब विचारण्याची हिंमत कोणत्याही देशाने दाखवली नाही. दोन देशामध्ये युद्ध स्थिती तयार करायची आणि शांततेचे दूत म्हणून पुढाकार घेतल्याचे भारावायचे, ही ट्रम्प यांची मानसिक गरज बनली आहे. कोणत्या देशाला, व्यक्तीला किती महत्त्व द्यायचे, प्रशासनात मदतीसाठी कोणाला घ्यायचे, याचे संकेत असतात. हे सर्व संकेत ट्रम्प यांनी धुडकावले. इराकमधील विशेष दूत म्हणून त्यांनी अमली पदार्थांच्या विक्रीची साखळी दुकाने असलेल्या एकाची निवड केली. मध्यंतरी रशिया- युक्रेन युद्धाबाबत चर्चेकरता आपल्या बांधकाम व्यावसायिक मित्राला पाठवले होते. अमेरिकेचा शत्रु अराणे धोक्याचे आणि मित्र असणे त्याहून अधिक अधिक धोक्याचे, असे हेन्री किसिंजर यांचे विधान अनेकदा उद्धृत केले जाते. ट्रम्प त्या विधानाचे चालते बोलते उदाहरण आहेत. अमेरिकेच्या पाठबळावर युक्रेन रशियाविरूद्ध लढत आहे. नाटोला रशियाच्या सीमेपाशी नेण्याचा प्रयास करणाऱ्या अमेरिकेमुळे युद्ध सुरु झाले, हे वास्तव प्रचार तंत्राने पडद्याआड करण्यात आले आणि रशियाची प्रतिमा 'युद्धखोर' अशी करण्यात आली. काही कालावधीपूर्वी ट्रम्प यांनी डोलेन्स्कींना अपमानित केले होतेच, आता पुन्हा तोच प्रकार घडल्याने हे असभ्य गृहस्थ नेमके मित्र कोणाचे आणि शत्रु कोणाचे, हे झेलेन्स्कीसह सर्वांनाच बुचकळ्यात पाडणारे आहे. जागतिक सत्ताकेंद्र एकच असून उपयोग नाही, तसे झाल्यास असंख्य देशावर टांगती तलवार राहते. या वास्तवाकडे पाहण्याची निकड ट्रम्प यांच्यामुळे निर्माण झाली आहे.

***

# फक्त एक महिना या पिठाची भाकरी खा आणि गव्हाची चपाती विसरा

## वजन झटपट कमी होईल



आजच्या धावपळीच्या जीवनात लोकांना स्वतःसाठी वेळ काढता येत नाही. त्यामुळे सकाळचा नाश्ता होत नाही, दुपारी जे मिळेल ते खाल्ले जाते आणि रात्री जड जेवण घेतले जाते. अशा चुकीच्या सवयींमुळे शरीरात चरबी साठते, वजन वाढते आणि त्यातून अनेक आजार उद्भवतात. अनेक जण वजन कमी करण्यासाठी महागड्या जिममध्ये जातात, महागड्या डाएट प्लॅनचे पालन करतात, विविध उपाय आजमावतात पण वजन काही केल्या कमी होत नाही. परंतु, यावरचा सोपा उपाय तुमच्या स्वतःच्या किचनमध्येच लपलेला आहे. जर तुम्ही रोज गव्हाची चपाती खात असाल, तर ती बदला. तिच्या ऐवजी ज्वारी किंवा नाचणीची भाकरी खायला सुरुवात करा. हे दोन्ही पीठ शरीरासाठी पोषक असून, पचन सुधारते आणि अतिरिक्त चरबी कमी करण्यास मदत होते.

ज्वारीची भाकरी - फिटनेस आणि एनर्जीचा पॉवर हाऊस म्हणजे ज्वारी आहे. जे लोक जिममध्ये जातात आणि वर्कआऊट करुन मसल्स बनवू इच्छीत आहेत त्यांच्यासाठी ज्वारीची भाकरी वरदान ठरू शकते. ज्वारीत प्रोटीनचे प्रमाण जास्त असते.त्यामुळे स्नायूंना ताकद मिळते आणि स्नायूं कमजोर होण्यापासून वाचतात. ज्वारीत फायबर मोठ्या प्रमाणात असते. ज्यामुळे एक किंवा दोन भाकरी खाल्ल्यानंतर लगेच पोठ भरते. त्यामुळे अनेक तास तुम्हाला भूक लागत नाही.त्यामुळे विनाकारण काहीही खाण्याला लगाम लागतो. ज्वारी पचनासाठी चांगली असते. पोट फुगणे असा समस्यांपासून आपल्याला वाचवते. जर तुम्हाला वजन कमी करण्या सोबतच शरीराला फिट आणि एनर्जेटिक राखायचे असेल तर ज्वारी तुमच्यासाठी योग्य आहे.

नाचणीची भाकरी - नाचणीची भाकरी खाल्ल्याने तुम्ही बारीक होऊ शकता. आणि हाडे देखील मजबूत होतात. आयुर्वेदात नाचणीला पौष्टीक गुणांचा खजाना म्हटले आहे.ही केवळ वजन कमी करत नाही तर शरीराला आतून देखील मजबूत बनवते. नाचणीत दूधाहून अनेक पटीने कॅल्शियमचे प्रमाण जादा असते. नाचणीत ज्वारीपेक्षा जास्त फायबर असते. नाचणीची भाकरी खाल्ल्याने पोट असे भरते की तुम्हाला बराच काळ आणखी काही खाण्याची इच्छा होत नाही. ज्यामुळे कॅलरीचे इनटेक आपोआप कमी होते. वजन वेगाने कमी होते. तुम्ही जर केवळ बारीक न होता हाडांना देखील मजबूत करु इच्छीत असाल तर नाचणी तुमच्यासाठी महत्वाची आहे.

ज्वारी आणि नाचणी ही दोन्ही धान्ये चांगले पोषक आहेत. परंतू तुमचे लक्ष्य काय आहे ? जर वजन घटवणे आणि मसल्स टिकवून ठेवणे हे तुमचे लक्ष असेल तर ज्वारीच्या भाकरीची निवड करावी. जर लक्ष्य वजन घटवणे आणि हाडांना मजबूत करण्याचे असेल तर नाचणीची भाकरी तुमच्यासाठी योग्य पर्याय आहे. तर तुम्ही गव्हाच्या चपातीला काही काळ आराम द्यावा आणि हे दोन सुपरफूड भाकऱ्या ट्राय कराव्यात. काही आठवड्यातच तुम्हाला फरक जाणवेल.

# युरिक ॲसिड पासून मुक्तता हवी असेल तर



शरीरामध्ये युरिक ॲसिडची पातळी वाढल्यास सांधेदुखी, सांध्यावर सूज येणे आणि चालणंही कठीण होते. २०२० मधील एका संशोधनातील माहितीनुसार, जगभरातील जवळपास ५६ दशलक्ष लोक युरिक ॲसिडच्या समस्येमुळे त्रस्त आहेत. या समस्येमुळे किडनी आणि शरीराच्या सांध्यांवर मोठ्या प्रमाणात दुष्परिणाम होऊ शकतात.

त्यासाठी तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार एक पेय रोज उपाशी पोटी पेयल्यास युरिक ऍसिड कमी होत जाते.

युरिक ॲसिडची पातळी नियंत्रणात आणणारे पेय

युरिक ॲसिडची पातळी नियंत्रणात आणणारे पेय तयार करण्यासाठी कोणकोणत्या गोष्टींचा समावेश करावा आणि किती प्रमाणात हे पेय प्यावे, जाणून घेऊया सविस्तर माहिती...सामग्री :अर्धा चमचा हळद पावडर हळदीमध्ये अँटी- इन्फ्लेमेटरी गुणधर्म आहेत, ज्यामुळे सांधेदुखी आणि सांध्यावरील सूज कमी होण्यास मदत मिळते.

एक चमचा धणे

धण्यातील पोषणतत्त्वांमुळे शरीरातील युरिक ॲसिड बाहेर फेकले जाण्यास मदत मिळते. यामुळे किडनीची कार्यप्रणाली देखील सुधारते.अर्धा चमचा जीरे-जिऱ्यातील पोषक घटकांमुळे पचनप्रक्रिया आणि किडनीची कार्यप्रणाली देखील सुधारते .

अर्धा चमचा मेथीच्या बिया

मेथीच्या बिया शरीरासाठी नॅचरल डिटॉक्सिफायरप्रमाणे काम करते, यामुळे यकृत आणि किडनीसारखे अवयव डिटॉक्स होण्यास मदत मिळते. मेथीच्या बिया रात्रभर भिजत ठेवा.

काळी मिरी-काळ्या मिरीमध्ये अँटी इन्फ्लेमेटरी आणि अँटी-ऑक्सिडंट्स गुणधर्म आहेत, ज्यामुळे सांधेदुखीची समस्या कमी होण्यासह संपूर्ण आरोग्यास लाभ मिळतात.कृती :१. सर्वप्रथम एका भांड्यामध्ये दोन कप पाणी घ्या.

२. गॅसच्या मध्यम आचेवर गरम करत ठेवा. ३. पाणी गरम होऊ लागल्यास त्यामध्ये अर्धा चमचा हळद घाला.४. एक चमचा धणे, अर्धा चमचा जीरे आणि भिजवलेल्या मेथीच्या बिया मिक्स करा.५. थोड्या वेळाने गॅस बंद करा.

६. एका कपमध्ये पाणी गाळून घ्या.

७. तुम्हाला हवे असल्यास त्यामध्ये लिंबाचा रस आणि मधही मिक्स करू शकता. पेय कधी प्यावे?

नियमित सकाळी रिकाम्या पोटी हे पाणी पिणे फायदेशीर ठरेल.

काही दिवसांतच तुम्हाला शरीरामध्ये सकारात्मक बदल अनुभवायला मिळतील.

# तोंड येण्याची समस्या का होते?

मुंबई : तोंड येणे म्हणजे तोंडात किंवा जिभेवर येणारे छोटेसे पण वेदनादायक फोड. ही एक सामान्य समस्या असली, तरी वारंवार होऊ लागल्यास त्याकडे दुर्लक्ष करता कामा नये. गरम पेये जसे की चहा किंवा कॉफी पिताना तोंड भाजणे, दात घासताना जिभेवर चुकून लागणे या कारणांनी तोंडात जखमा होऊ शकतात. पण जर कोणतीही बाह्य दुखापत न होता तोंड वारंवार येत असेल, तर हे आरोग्याच्या इतर समस्यांचे संकेत असू शकते.

**त्यावरचे घरगुती उपाय:**

तोंड येण्यामागची प्रमुख कारणे

रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे शरीराची प्रतिकारशक्ती कमी झाल्यास संक्रमण होण्याची शक्यता वाढते. यामुळे तोंड येण्याचे प्रमाण वाढू शकते. हार्मोन्समधील चढ-उतार महिलांमध्ये मासिक पाळी दरम्यान हार्मोनल बदल होतात. त्यामुळे या काळात तोंड येण्याची समस्या जाणवते.

व्हिटॅमिन्सची कमतरता व्हिटॅमिन इ१२, आयर्न आणि फॉलिक ॲसिडच्या कमतरतेमुळे तोंडात वारंवार फोड येतात.पचनतंत्रातील बिघाड अपचन, बद्धकोष्ठता किंवा आंतड्यांचे विकार असलेल्या व्यक्तींमध्ये तोंड येण्याची समस्या अधिक दिसून येते. संसर्ग आणि ॲलर्जी दूषित पाणी पिणे, बॅक्टेरिया किंवा व्हायरल संसर्ग, तसेच काही ॲलर्जीक पदार्थ खाल्ल्यामुळेही तोंडात फोड येऊ शकतात.

## डॉक्टर टिप्स

### मासिक पाळीदरम्यान जोडीदारासोबत सहवास? योग्य की अयोग्य?



सहवासच्या संदर्भात प्रत्येकाचे अनुभव वेगवेगळे असतात. ऐकीव माहितीवर गोष्टी करण्यात काहीच अर्थ नाही. पण मी माझ्या अनुभवावरून सांगू शकते की पाळीदरम्यान सहवास म्हणजे काही विचित्र नाही.(बीबीसी थ्रीच्या यांच्या वृत्तलेखाचा संपादित अनुवाद) हे वाचलंत का? पाळीविषयीबोलूया : 'पाळी सुरू झाली अन् आजीची शेवटची आठवण हुकली...'पाळीविषयीबोलूया : 'पाळीची रजा म्हणजे मला कमकुवतपणा वाटत नाही' पाळीविषयीबोलूया : 'त्या चार दिवसांत मी कधीच वेगळी नव्हते...' पाळीविषयीबोलूया - 'पुरुषांना मासिक पाळी विषयी सज्ञान करण्याची गरज' पाळीविषयीबोलूया : सॅनिटरी नॅपकिन्सला ५ पर्याय पाळीविषयीबोलूया - कपड्यांना मागे रक्ताचा डाग पडतो तेव्हा...

## विनोद




तुला आपल्या लग्नाच्या पहिल्या वाढदिवसाला काय हवं? सिंगापूरची दोन तिकिटं की एक छानसा टेपरेकॉर्डर? अनिलने आपल्या पत्नीला विचारले.

'सिंगापूरची दोन तिकिटंच आणा'

'का ग?'

कारण तिथं गेल्यावर टेपरेकॉर्डर घेता येईल. सिंगापूरला टेपरेकॉर्डर खूप स्वस्त मिळतात.

## संदेश


Har subah teri duniya me roshni kar de

Rab tere gum ko teri khushi kar de,

Jab bhi tootne lage teri sansein….

Khuda tujme shamil meri zindagi kar de.

## सुविचार



पुष्कळ ग्रंथांचे वाचन करण्यापेक्षा थोड्या ग्रंथांचे मनन केलेले अधिक चांगले.


**- ग.त्र्यं. माडखोलकर**

**संस्कृत सुभाषित**

**जीवन्तोऽपि मृता: पञ्च व्यासेन परिकीर्तिता:**
**। दरिद्रो, व्याधितो, मूर्ख:, प्रवासी नित्यसेवक: ।।**

**अर्थ :** दरिद्री, रोगी, मूर्ख, प्रवासी आणि वेठबिगार कामगार हे पाचजण जिवंत असून मेल्यासारखे आहेत अशी व्यासोक्ती आहे.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. गाळ पण टाकाऊ नाही
२अ. ताळतंत्र सुटलेला
५. रोड टॅक्स-मराठीत
८. तोंडाचा पट्टा
११. पुरणपोळीबरोबर केली जाणारी आमटी
१२. अटीची भाषा
१४. चीज, वस्तू
१५. त्याग केला
१७. अर्धांगवायू
१९. ढीग
२१. सत्ता
२३. उत्तराधिकारी
२४. वाघाची मावशी
२५. शेवट, नाश
२६. मालक, सरदार, शासनसत्ता
२८. पाण्यापासून उत्पन्न
३१. चामखीळ
३३. एकरूप
३४. झाडाचे टॉनिक
३५. सरस्वती (ग्रा.)
३६. बातमी
३७. वारा, त्रास
३८. भांडण
४०. कैफ, धुंदी
४२. कधी मर्दानगीचे कधी भिकारपणाचे लक्षण
४३. नऊ भावना
४५. कडक व चिवट
४६. एक देवयोनी, स्वर्गातील गायक
४७. संत, अवलिया
४८. रागाचा ठिकाणा
४९. गंमत, मजा
५०. स्वयंपाकी
५३. आवाजांचा गोंधळ
५४. सन्मानाची रक्कम
५६. खोदकाम
५८. पुत्री, मुलगी
६०. लाकडी जिना
६२. दात
६४. जबरदस्त, धिप्पाड
६७. चेहऱ्यावरील कांती
६८. काळ्या तोंडाचे माकड
७०. राजपुत्र सलीमची प्रेयसी
७२.सवाद्य
७४. हिंदीत झणझणीत
७५. गायीचे पिल्लू
७७. शिक्षा
७८. मोगऱ्याची माळ
८०. खूळ
८२. अगदी सरळ
८३. दुसऱ्याच्या मनातील जाणणारा
८४. रश्शावरील तवंग, कट

### उभे शब्द

१. उमदा, रंगेल
२. बतावणी
३. आलेख- चढता वा उतरता
४. पुरुष
५. घागरा
६. बटवा
७. रमापती
८. पृथ्वी, गाय
९. पूर्ण भरतीची वेळ
१०. सिंह
१३. समशेर
१६. पुत्र (हिंदी)
१८. दिवस
२०. लिंबू पाणी
२२. गंध
२४. पतंगाचा धागा
२५. अकस्मात
२६अ. ईदने सांगता होणारा उपवासाचा महिना
२७. खोकला
२८. पाणी देणारा
२९. फळातील द्रव
३०. वस्ती
३२. जास्तीत जास्त व कमीत कमी
३३. टोळीचा प्रमुख
३४. धोकादायक
३७. संधी
३९. बरोबर आलेला फौजफाटा
४१. शिक्षा
४३. पाताळात भोगाव्या लागणाऱ्या वेदना
४४. संपूर्ण
५०. घराणे
५१. शर्करा
५२. पाडाव, हार
५५. फायदा
५७. पुरुष
५९. वनवास
६१. दार
६३. हुण्डा (हिंदी)
६५. घरंदाज, कुलीन स्त्री
६६. टपालकचेरी
६९. मत देणे
७१. मुंग्यांचे घर
७३. धट्टकट्टा
७६. फटाक्यांची माळ
७७. उथळ पसरट वाटी
७९. रात्र
८१. निर्माण झालेले अंतर

### आडवे उत्तरे


१.छाना २अ.बेभान ५.पथकर ८.वसवस ११.कट १२.जरतर १४.सामानसुमान १५.टाकला १७.लकवा १९.रास २१.लवाद २३.वारदार २४.मांजर २५.अस्त २६.सरकार २८.नीरजा ३१.मस ३३.समरस ३४.खत ३५.सारजा ३६.समाचार ३७.वात ३८.कलह ४०.नशा ४२.दाढी ४३.नवरस ४५.वातड ४६.किन्नर ४७.पीर ४८.नाक ४९.मौज ५०.खानसामा ५३.कलकल ५४.मानधन ५६.खनन ५८.तनया ६०.दादर ६२.रदन ६४.तगडा ६७.रया ६८.वानर ७०.अनारकली ७२.वाजतगाजत ७४.तीखा ७५.वासरू ७७.सजा ७८.गजरा ८०.नाद ८२.सरळसोट ८३.मनकवडा ८४.तर्री

### उभे उत्तरे

१.छाकटा २.नरम ३.भाजणी ४.नर ५.परकर ६.कसा ७.रमावर ८.वसुधा ९.समा १०.वनराज १३.तलवार १६.ताल १८.वासर २०.सरबत २२.वास २४.मांजा २५.अचानक २७.कास २८.नीरद २९.रस ३०.वसाहत ३२.कमलकिमान ३३.सरदार ३४.खतरनाक ३७.वाव ३९.लवाजमा ४१.शासन ४३.नरकयातना ४४.सकल ५०.खानदान ५१.साखर ५२.पतन ५५.नफा ५७.नर ५९.अरण्यवास ६१.दरवाजा ६३.दहेज ६५.गरती ६६.डाकखाना ६९.मतदान ७१.वारूळ ७३.तगडा ७६.सर ७७.सट ७९.रात ८१.दरी



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### तिसऱ्या युथ आशियाई क्रीडा स्पर्धेत कबड्डीत भारताला सुवर्णपदक

**मुंबई**–बहरीनमधील मनामा येथे आशियाई युवा क्रीडा स्पर्धा २०२५ मध्ये भारताने कबड्डीमध्ये पूर्ण विजय मिळवत सुवर्ण पदक पटकावलं. मुलींच्या संघात कांजूरमार्ग येथील खेळाडू कुमारी सेरेना सचिन म्हसकर हिने भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळवला. या कामगिरीबद्दल क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी सेरेनासह भारतीय कबड्डी संघाचं अभिनंदन केले आहे.
कबड्डीत मुलांमुलींची उल्लेखनीय कामगिरी – १९ ते २३ ऑक्टोबर २०२५ रोजी पार पडलेल्या तिसऱ्या युथ आशियाई क्रीडा स्पर्धेत मुंबई उपनगर जिल्ह्यातील कांजूरमार्ग येथील स्वराज्य स्पोर्ट्स क्लबची खेळाडू कुमारी सेरेना म्हसकर हिने भारताचं प्रतिनिधित्व केलं. मुले आणि मुली या दोन्ही भारतीय संघाने या स्पर्धेत अत्यंत उल्लेखनीय कामगिरी करीत सुवर्णपदक पटकावून देशाची मान उंचावली. तसंच सेरेनाच्या या यशामुळे मुंबई उपनगर जिल्ह्यात आनंदाचं वातावरण असून क्रीडाक्षेत्रातील नवोदितांसाठी ती प्रेरणास्थान ठरली आहे. या उत्कृष्ट यशाबद्दल क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे यांनी सेरेना म्हसकर हिचं तसंच प्रशिक्षक, पालक आणि स्वराज्य स्पोर्ट्स क्लबच्या व्यवस्थापनाचं विशेष अभिनंदन केली आहे.

***

### राष्ट्रध्वजाचा अपमान टाळण्यासाठी कोहलीने केलेल्या कृतीचे अनेकांनी केले कौतुक

सिडनी–रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या जबरदस्त बॅटिंग भारतानं ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या तिसऱ्या सामन्यात विजय मिळवला आहे. या मॅचमध्ये रोहितनं दमदार शतक झळकावलं, तर विराट कोहलीनं अर्धशतक झळकावून चाहत्यांना खुश केलं. त्यामुळे सध्या सोशल मीडियावर या दोघांचीच जोरदार चर्चा सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर विराट कोहलीचा एक भावनिक व्हिडिओ व्हायरल होत आहे.
चाहत्यांचं हॅन्डशेक स्विकारत असताना एका चाहत्याच्या हातातून भारतीय ध्वज खाली पडला. पण गर्दीतही विराटचं लक्ष लगेच त्या झेंड्याकडे गेलं. त्यानं तत्काळ मागे फिरून खाली वाकत झेंडा उचलला आणि चाहत्याला परत दिला. विराटच्या या देशभक्तीच्या कृतीचं फॅन्सकडून भरभरून कौतुक होत आहे. हा व्हिडिओ ॅन्रहहल्साहर० या अकाउंटवरून शेअर करण्यात आला आहे. व्हिडिओमध्ये दिसतं की, मैदानातून ड्रेसिंग रूमकडे जात असताना विराट आणि रोहित दोघंही चाहत्यांचं हॅन्डशेक स्विकारत होते.

****

### ऑस्ट्रेलियात पॅरा बॅडमिंटनमध्ये भारताला मिळाले ११ पदके

नवी दिल्ली–ऑस्ट्रेलिया पॅरा बॅडमिंटन इंटरनॅशनल २०२५ मध्ये भारतीय पॅरा–बॅडमिंटन खेळाडूंनी शानदार कामगिरी करत पदकतालिकेत अव्वल स्थान पटकावले. पॅरालिम्पिक चॅम्पियन प्रमोद भगतने दोन सुवर्णपदके जिंकली, तर सुकांत कदमने एक सुवर्ण आणि एक रौप्यपदक जिंकले.प्रमोद भगतने पुरुष एकेरी एसएल३ प्रकारात सुवर्णपदक जिंकले, अंतिम सामन्यात त्याचा सहकारी खेळाडू मनोज सरकारचा २१–१५, २१–१७ असा पराभव केला. त्यानंतर भगतने सुकांत कदमसोबत जोडी करून पुरुष दुहेरी एसएल ३– एसएल ४ चे विजेतेपद जिंकले. अंतिम सामन्यात भारतीय जोडीने उमेश विक्रम कुमार आणि सूर्यकांत यादव यांचा २१–११, १९–२१, २१–१८ असा पराभव केला. विजयानंतर भगत म्हणाले, दोन सुवर्णपदके जिंकून मला खूप आनंद झाला आहे. मनोजविरुद्धचा सामना कठीण होता कारण आम्ही दोघेही एकमेकांचा खेळ चांगल्या प्रकारे जाणतो.

***

### रोहित–विराट वनडेमध्ये पुन्हा कधी दिसणार? लिहून ठेवा तारीख

मुंबई –भारतीय क्रिकेट संघानं ऑस्ट्रेलियाविरुद्धचा तिसरा वनडे सामना ९ विकेट्सनं जिंकला. २५ ऑक्टोबर, शनिवारी सिडनी क्रिकेट ग्राउंडवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतासमोर २३७ धावांचं लक्ष्य ठेवलं होतं, जे भारतीय संघानं सहज साध्य केलं. अनुभवी फलंदाज रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. दोन्ही अनुभवी खेळाडूंनी त्यांच्या दर्जाचं प्रदर्शन केलं आणि कांगारु संघाला पराभूत केलं.रोहित–विराटची विक्रमी भागीदारी : या सामन्यात धावांचा पाठलाग करताना दुसऱ्या विकेटसाठी रोहित आणि विराटमध्ये १६८ धावांची नाबाद भागीदारी झाली, ज्यामुळं भारतीय संघाचा विजय निश्चित झाला. रोहित शर्मा १२१ धावांवर नाबाद राहिला, तर विराट कोहली ७४ धावांवर नाबाद राहिला.

# भारत - ऑस्ट्रेलिया टी-२० थरार सुरू

**टी-२० चा पहिला सामना २९ ऑक्टोबर रोजी सुरू!**



नवी दिल्ली: दिवाळीनंतर भारत आणि ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघांच्या चाहत्यांचे लक्ष आता ढ२० क्रिकेटवर वळले आहे. २९ ऑक्टोबर रोजी कॅनबेरा येथील मनुका ओव्हलवर पाच सामन्यांची ढ२० मालिका सुरू होत असून, भारताचे युवा कर्णधार सूर्यकुमार यादव नेतृत्वाखाली संघ सामना खेळणार आहे. एकदिवसीय मालिकेत भारताला पराभवाचा सामना करावा लागला होता, तर आता ढ२० मालिकेत संघ आपले नशीब बदलण्यासाठी तयार आहेत. आगामी आयसीसी ढ२० विश्वचषक २०२६ लक्षात घेता, या मालिकेतील प्रत्येक सामना दोन्ही संघांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. भारताने गेल्या काही वर्षांत ढ२० क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली आहे, यामध्ये आयसीसी ढ२० विश्वचषक २०२४ आणि आशिया कप २०२५ चा समावेश आहे. मात्र, ऑस्ट्रेलियातील त्यांच्या कामगिरीचे आकडे फारसे चांगले नाहीत, त्यामुळे भारतीय संघासमोर अतिरिक्त आव्हान आहे.
भारत – ऑस्ट्रेलिया ढ२० मालिका २०२५: सामना वेळापत्रक
१ला ढ२०: २९ ऑक्टोबर – मनुका ओव्हल, कॅनबेरा
संघ: ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारत
वेळ: दुपारी १:४५
२रा ढ२०: ३१ ऑक्टोबर – मेलबर्न क्रिकेट ग्राउंड, मेलबर्न
संघ: ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारत
वेळ: दुपारी १:४५
३रा २०: २ नोव्हेंबर – बेलेरिव्ह ओव्हल, होबार्ट
संघ: ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारत
वेळ: दुपारी १:४५
४था ढ२०: ६ नोव्हेंबर – बिल पिपेन ओव्हल, गोल्ड कोस्ट
संघ: ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारत
वेळ: दुपारी १:४५
५वा ढ२०: ८ नोव्हेंबर – द गॅबा, ब्रिस्बेन
संघ: ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारत
वेळ: दुपारी १:४५
भारतीय संघ–
सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुभमन गिल (उपकर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, शिवम दुबे, नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, जितेश शर्मा (यष्टिरक्षक), वरुण चक्रवर्ती, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंह, कुलदीप यादव, हर्षित राणा, संजू सॅमसन (यष्टिरक्षक), रिंकू सिंग आणि वॉशिंग्टन सुंदर.
ऑस्ट्रेलियन संघ
मिच मार्श (कर्णधार) नेतृत्वाखाली ट्रेविस हेड, सीन बॉट, जेवियर बार्टलेट, टिम डेव्हिड, बेन ड्वार्शिस, नाथन एलिस, जोश हेझलवूड, जोश इंग्लिस (यष्टिरक्षक), मॅथ्यू कुहनेमन, मिशेल ओवेन, मॅथ्यू शॉर्ट, मार्कस स्टोइनिस आणि डम झम्पा सामील आहेत.
आधीच्या तीन सामन्यांच्या वन–डे मालिकेत भारताने पर्थ आणि डलेडमध्ये पराभव पत्करला, मात्र सिडनीत अंतिम सामना रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या दमदार खेळामुळे ९ विकेट्सने जिंकला. या पराभवाच्या उलटफेरीसाठी आता भारतीय संघ ढ२० मालिकेत सज्ज झाला आहे, ज्यामध्ये 'कॅप्टन स्काय' सूर्यकुमार यादव युवा संघाचे नेतृत्व करत आहे.
ढ२० मालिकेचा थरार ८ नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार असून, भारतीय संघाच्या युवा खेळाडूंनी दमदार कामगिरी करावी अशी चाहत्यांची अपेक्षा आहे.

## ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर रोहित शर्माची भावूक पोस्ट



**सिडनी**–भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातली तीन सामन्यांची वनडे मालिका पार पडली आहे. ही मालिका २–१ ने ऑस्ट्रेलियाने जिंकली आहे. ऑस्ट्रेलियाला व्हाईटवॉशची संधी होती, पण रोहित शर्माच्या शतकीय आणि विराट कोहलीच्या अर्धशतकीय खेळीमुळे ती हुकली होती. या मालिकेत रोहित शर्माने उत्कृष्ट खेळी केली. त्यामुळे त्याला प्लेअर ऑफ द सीरीजचा किताब मिळाला होता. या मालिकेनंतर आता रोहित शर्मा सिडनीवरून मुंबईच्या निघाला होता. दरम्यान सिडनी सोडण्याआधी रोहित शर्माने एक पोस्ट शेअर केली आहे.या पोस्टने चाहत्यांची धाकधूक वाढली आहे.त्यामुळे या पोस्टमध्ये काय आहे? हे जाणून घेऊयात.

**चाहत्यांचा घेतला शेवटचा निरोप, नेमका अर्थ काय?**

सिडनी सोडल्यानंतर लगेचच रोहित शर्माने एक भावूक पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे. या पोस्टमध्ये रोहित शर्मा लिहतो की, 'पुन्हा एकदा शेवटचा निरोप घेतो सिडनी',असे त्याने म्हटले आहे. या पोस्टमुळे रोहित शर्मा निवृत्ती घेतोय की काय? असा चाहत्यांना प्रश्न पडला आहे. पण असे अजिबात नाही आहे, तर रोहित शर्माला ज्या ऑस्ट्रेलियन चाहत्यांनी दौऱ्या दरम्यान प्रेम दिलं आणि पाठिंबा दर्शवला,त्या सर्व चाहत्यांचा त्याने निरोप दिला आहे. खरं तर या दौऱ्यानंतर पुन्हा ऑस्ट्रेलियात कधी येता येणार आहे? याची काहीच कल्पना नसल्याने त्याने अशी पोस्ट केली आहे.
दरम्यान ऑस्ट्रेलियाविरुद्ध नुकत्याच पार पडलेल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत माजी भारतीय कर्णधार रोहित शर्माने शानदार कामगिरी केली.रोहित शर्मा या मालिकेत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता. त्याने १०१ च्या स्ट्राईक रेटने २०२ धावा केल्या ज्यामध्ये एक शतक आणि एक अर्धशतक समाविष्ट आहे. रोहितने ॲडलेड ओव्हल येथे झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात ७३ आणि सिडनीतील तिसऱ्या आणि शेवटच्या एकदिवसीय सामन्यात नाबाद १२१ धावा केल्या होत्या.सिडनीमध्ये खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात, हिटमॅनने केवळ त्याच्या संघाला विजय मिळवून दिला नाही तर संस्मरणीय शतकासह त्यांना क्लीन स्वीपपासून वाचवले होते.त्यामुळे मालिता २–१ ने सुटली होती. यासोबत सामन्यानंतर रोहित आणि कोहलीने ॲडम गिलख्रिस्ट आणि रवी शास्त्री यांच्याशी खास संवाद साधला होता. या दरम्यान रोहित म्हणाला, ''ऑस्ट्रेलियात येऊन येथे खेळणे नेहमीच आनंददायी असते. २००८ च्या माझ्या आठवणी अजूनही ताज्या आहेत. मला माहित नाही की आपण ऑस्ट्रेलियात परत येऊ की नाही. आपण कितीही कामगिरी केली तरी आपण आपल्या क्रिकेटचा आनंद घेतो. आपण पर्थमध्ये एक नवीन जीवन सुरू केले,असे रोहितने सामन्यानंतर सांगितले होते.

## मुंबईतील फुटबॉलपटूंना सुवर्णसंधी!

मुंबई–महाराष्ट्र संस्था फॉर ट्रान्सफॉर्मेशन , सिडको (उख–ऊउज) आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (थखत्रऊअ) यांच्या संयुक्त विद्यमाने आणि मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार क्रीडा विभागामार्फत, राज्यभरात मफ्ममहादेवा प्रकल्पांतर्गत शिष्यवृत्ती योजनाफ्फ राबविण्यात येत आहे. या योजनेचा उद्देश राज्यातील फुटबॉल खेळाचा विकास, प्रसार व लोकप्रियता वाढविणे हा आहे. ही योजना १३ वर्षाखालील मुलं व मुली यांच्यासाठी असून अर्जदारांची जन्मतारीख ०१ जानेवारी २०१२ ते ३१ डिसेंबर २०१३ दरम्यान असणे आवश्यक आहे.
या योजनेअंतर्गत जिल्हा, विभागीय आणि राज्य स्तरावर फुटबॉल निवड चाचण्या आयोजित केल्या जाणार आहेत. या निवड चाचण्यांच्या माध्यमातून राज्यातील ३० मुलं आणि ३० मुलींची अंतिम निवड करण्यात येणार आहे. निवड झालेल्या खेळाडूंना १४ डिसेंबर २०२५ रोजी मुंबईत जागतिक ख्यातीचे फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी यांच्यासोबत खेळण्याची अविस्मरणीय संधी मिळणार आहे.मुंबई जिल्ह्यासाठीची निवड चाचणी नवल डीफ्सूझा फुटबॉल ग्राउंड, वांद्रे (मुंबई) येथे होणार असून, केवळ ऑनलाईन नोंदणी केलेल्या खेळाडूंनाच या निवड चाचणीसाठी माहिती व पुढील मार्गदर्शन मिळेल.
नोंदणीसाठी खालील लिंक सक्रिय करण्यात आली आहे.

## ठरले तर! टीम इंडिया सेमी फायनलमध्ये बलाढ्य संघाशी भिडणार, कधी आणि कुठे आहे सामना?

सिडनी–आयसीसी वुमेन्स वर्ल्डकपच्या सेमी फायनलसाठी ऑस्ट्रेलिया, साऊथ आफ्रिका, इंग्लंड आणि इंडिया हे चारही संघ क्वालिफाय झाले आहेत. आज ऑस्ट्रेलियाने साऊथ आफ्रिकेचा ७ विकेटसने पराभव केला आहे.या सामन्याच्या निकालानंतर आता सेमी फायनलच गणित जवळपास स्पष्ट झालं आहे. त्यामुळे टीम इंडियासोबत सेमी फायनलमध्ये कोणता संघ भिडणार? आणि हा सामना नेमका कधी खेळवला जाणार आहे. हे जाणून घेऊयात.खरं तर आजच्या सामन्यात साऊथ आफ्रिका संघ प्रथम फलंदाजी करताना ९७ धावांवर ऑलआऊट झाला होता. त्यामुळे या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने ७ विकेटस राखून पराभव केला आहे. ऑस्ट्रेलियाच्या या विजयानंतर सेमी फायनलच गणित जवळपास स्पष्ट झालं आहे. कारण आज ऑस्ट्रेलिया साखळी फेरीतला शेवटचा सामना जिंकुन १३ गुणांसह पहिल्या स्थानी कायम राहिली आहे. त्यांचा रनरेट हा +२.१०२ आहे. तर दुसऱ्या स्थानी आजच्या सामन्यात पराभूत झालेला साऊथ आफ्रिका आहे. आफ्रिकेचे आता १० गुण आहेत आणि रनरेट –०.४२० आहे.आता यानंतर इंग्लड आणि भारताचा साखळी फेरीतला एक एक सामना उद्या खेळवला जाणार आहे. आता इंग्लंड जर रविवारी न्यूझीलंडविरूद्ध जिंकली तर त्यांचे गुण ११ होणार आहेत. आणि भारताने जरी बांग्लादेशचा पराभव केला तरी त्यांचे गुण ८ होणार आहे.त्यामुळे या सामन्यांमुळे फक्त गुण वाढणार आहेत, संघाच्या क्रमवारीत कोणताही बदल होणार नाही आहे.त्यामुळे सेमी फायनलच चित्र स्पष्ट झालं आहे.पॉईंटस टेबलमध्ये पहिल्या स्थानी असणाऱ्या ऑस्ट्रेलिया आणि चौथ्या स्थानी असलेल्या भारत यांच्यात सेमी फायनलचा सामना खेळवला जाणार आहे. हा गुरूवारी ३० ऑक्टोबर २०२५ ला नवी मुंबईच्या डी.वाय. पाटील स्टेडिअमवर खेळवला जाणार आहे. तर दुसरा सेमी फायनल हा दुसऱ्या स्थानी असलेल्या साऊथ आफ्रिका आणि तिसऱ्या स्थानी असलेल्या इंग्लंड यांच्यात खेळवला जाणार आहे.हा सामना बुधवारी २९ ऑक्टोबर २०२५ ला गुवाहाटीच्या बारसपारा स्टेडिअम ला खेळवला जाणार आहे.दरम्यान या दोन सामन्यातून विजय मिळवणारे दोन संघ फायनलमध्ये भिडणार आहेत. हा सामना २ नोव्हेंबरला खेळवण्यात येणार आहेत.हे दोन संघ कोण असणार आहेत? हे सेमी फायनल सामन्यानंतर स्पष्ट होतील.



## आम्ही पुन्हा खेळायला येऊ की नाही माहित नाही, रोहित–विराटची मॅचविनिंग खेळीनंतर...

**सिडनी**– सिडनीमध्ये रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या फटकेबाजीने धुमाकूळ घातला. रोहित शर्मा आणि विराट कोहली या जोडीने १६८ धावांची भागीदारी रचत भारताला तिसऱ्या वनडेत एकतर्फी विजय मिळवून दिला. रोहितने शतकी खेळी केली तर विराटने अर्धशतक केले. रोहित–विराटने या मॅचविनिंग खेळीनंतर त्यांच्या निवृत्तीवर मोठे वक्तव्य केले.
ॲडलेडनंतर, तिसऱ्या एकदिवसीय सामन्यातही हिटमॅनने बॅटने उत्कृष्ट कामगिरी केली. रोहितने शानदार फलंदाजी करत १२५ चेंडूत नाबाद १२१ धावा केल्या. दोन वेळा शून्यावर बाद झाल्यानंतर विराटनेही उत्कृष्ट फॉर्ममध्ये येऊन ८१ चेंडूत ७४ धावांची खेळी करत रोहितला चांगली साथ दिली. कोहली आणि रोहितने दुसऱ्या विकेटसाठी १६८ धावांची अखंड भागीदारी केली आणि संघाला विजयाकडे नेले.
भारताच्या विजयानंतर, रोहित आणि कोहलीने एकत्रितपणे माजी क्रिकेटपटू रवी शास्त्री व एडम गिलक्रिस्ट यांच्याशी चर्चा केली. रोहित शर्मा आधी म्हणाला, ''मला नेहमीच ऑस्ट्रेलियात येऊन खेळायला आवडतं आणि सिडनीच्या या मैदानावर क्रिकेट खेळण्याचा अनुभव नेहमीच खास राहिला आहे. २००८ मधल्या माझ्या पहिल्या ऑस्ट्रेलिया दौऱ्याच्या आठवणी पुन्हा जाग्या झाल्या, तो दौरा खरंच कमाल होता. आता आम्ही पुन्हा इथे खेळायला येऊ की नाही माहित नाही, पण प्रत्येक क्षणाचा मी मनापासून आनंद घेतलाय.'' ''गेल्या अनेक वर्षांतील सन्मान आणि यशापेक्षा आम्हाला क्रिकेट खेळण्याचा आनंद जास्त महत्त्वाचा वाटतो. मागील १५ वर्षांत काय झालं यापेक्षाही मला इथे खेळायला नेहमीच आवडत आलं आहे आणि मला वाटतं विराटसाठीही हेच खरं आहे. त्यामुळे ऑस्ट्रेलियाचे खूप खूप आभार,'' असं रोहित म्हणाला.

**कोहली म्हणाला, पुढच्या काही दिवसांत**

विराट कोहली पुढे म्हणाला, ''आपण कितीही वर्षं आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळलो तरी हा खेळ नेहमी काहीतरी नवं शिकवतो (पहिल्या दोन सामन्यात शून्यावर बाद होण्याबद्दल बोलताना विराटने सांगितलं). काही दिवसांत मी ३७ वर्षांचा होणार आहे, पण धावांचा पाठलाग करताना माझ्यातील सर्वोत्तम खेळी आपोआप बाहेर येते. रोहितबरोबर मोठी, सामना जिंकवणारी भागीदारी करायला छान वाटलं''.''सुरुवातीपासूनच आम्ही परिस्थिती समजून खेळण्यावर भर दिला आहे, आणि हेच आमचं बलस्थान आहे. आज आम्ही कदाचित सर्वात अनुभवी जोडी आहोत, पण जेव्हा आम्ही तरुण होतो, तेव्हाही आम्हाला ठाऊक होतं की मोठी भागीदारी करून सामना आपल्या बाजूने वळवता येतो. मला वाटतं हे सगळं २०१३ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या घरच्या मालिकेत सुरू झालं. जर आम्ही एकत्र २० षटके टिकून खेळलो, तर संघाला विजयाच्या जवळ नेऊ शकतो आणि प्रतिस्पर्ध्यांनाही ते जाणवते.''''आम्हाला या देशात यायला नेहमीच आवडते, इथे आम्ही नेहमी छान क्रिकेट खेळलो आहोत. इतक्या मोठ्या संख्येने प्रेक्षकांनी येऊन आम्हाला पाठिंबा दिल्याबद्दल मनापासून धन्यवाद!'', असे म्हणत विराट–रोहितने ऑस्ट्रेलियाचे आभार मानले.
रोहित शर्मा–विराट कोहलीचा हा त्यांच्या कारकिर्दीतील अखेरचा ऑस्ट्रेलिया दौरा असणार आहे. यानंतर वनडे वर्ल्डकप २०२७ पर्यंत पुन्हा संघ ऑस्ट्रेलियात खेळण्यासाठी जाणार नाही.

# मध्य रेल्वेद्वारे दिवाळी आणि छठ पूजा उत्सवानिमित्त विशेष, ट्रेन सेवा

**मुंबई/प्रतिनिधी** : मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री. विजय कुमार यांनी सांगितले की, मध्य रेल्वेकडून २७ ऑक्टोबर २०२५ रोजी एकूण २३ गाड्या चालविण्यात येणार आहेत.

मुंबई विभाग – २७.१०.२०२५ (छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस / लोकमान्य टिळक टर्मिनस येथून सुटणाऱ्या गाड्यांचे तपशील)

१. गाडी क्र. ०१०४५ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – गाजीपूर सिटी विशेषछत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ०७.३५ वाजता सुटेल.

थांबे: दादर, ठाणे, कल्याण, नाशिक रोड, चाळीसगाव, जळगाव, भुसावळ, इटारसी, जबलपूर, कटनी, सतना, मणिकपूर, प्रयागराज छवकी, वाराणसी, जौनपूर आणि औड़िहार संरचना: दोन वातानुकूलित तृतीय श्रेणी ,अठरा शयनयान / सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन.

२. गाडी क्र. ०११४५ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – आसनसोल विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ११.०५ वाजता सुटेल.

थांबे: दादर, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, भुसावळ, इटारसी, भोपाळ, बीना, वीरांगना लक्ष्मीबाई झांसी, उरई , गोविंदपुरी, फतेहपूर, प्रयागराज, पं. दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, भभुआ, सासाराम, देवरिया सदर, अनुग्रह नारायण रोड, गया, कोडरमा, हजारीबाग रोड, पारसनाथ, नेताजी सुभाषचंद्र बोस गोमोह, धनबाद आणि कुल्टी. संरचना: वीस वातानुकूलित तृतीय श्रेणी आणि दोन जनरेटर.

३. गाडी क्र. ०१०७९ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – गोरखपूर विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून २२.३० वाजता सुटेल.

थांबे: दादर, ठाणे, कल्याण, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, खंडवा, इटारसी, भोपाळ, बीना, वीरांगना लक्ष्मीबाई झांसी, उरई , कानपूर सेंट्रल, लखनऊ, गोण्डा, बस्ती आणि खलिलाबाद.

संरचना: तीन वातानुकूलित तृतीय श्रेणी, दहा शयनयान, पाच सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन.

४. गाडी क्र. ०११४३ लोकमान्य टिळक टर्मिनस – दानापूर विशेष लोकमान्य टिळक टर्मिनस येथून १०.३० वाजता सुटेल.

थांबे: ठाणे, कल्याण, नाशिक रोड, भुसावळ, खंडवा, इटारसी, जबलपूर, सतना, मणिकपूर, प्रयागराज छवकी, पं. दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर आणि आरा. संरचना: तीन वातानुकूलित तृतीय श्रेणी, दहा शयनयान, पाच सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन.

५. गाडी क्र. ०१०१७ लोकमान्य टिळक टर्मिनस – दानापूर विशेष लोकमान्य टिळक टर्मिनस येथून १२.१५ वाजता सुटेल.

थांबे: ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, जळगाव, भुसावळ, खंडवा, इटारसी, भोपाळ, बीना, वीरांगना लक्ष्मीबाई झांसी, ओरई, गोविंदपुरी जंक्शन, फतेहपूर, सुबेदारगंज, पं. दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर आणि आरा. संरचना: दोन वातानुकूलित द्वितीय श्रेणी, आठ वातानुकूलित तृतीय श्रेणी, चार शयनयान, सहा सामान्य द्वितीय श्रेणी, एक सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन आणि एक जनरेटर.

६. गाडी क्र. ०१०६३ लोकमान्य टिळक टर्मिनस – दानापूर विशेष लोकमान्य टिळक टर्मिनस येथून २३.५५ वाजता सुटेल. थांबे: ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, भुसावळ, खंडवा, इटारसी, जबलपूर, कटनी, सतना, मणिकपूर, प्रयागराज छवकी, पं. दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर आणि आरा. संरचना: आठ शयनयान, अकरा सामान्य द्वितीय श्रेणी, दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन आणि एक पॅन्ट्री कार.

पुणे विभाग – २७.१०.२०२५ पुणे / हडपसर / खडकी / दौंड / कोल्हापूर येथून सुटणाऱ्या विशेष गाड्यांचे तपशील

७. गाडी क्र. ०१४१५ पुणे – गोरखपूर विशेष पुणे येथून ०६.५० वाजता सुटेल. थांबे: दौंड कॉर्ड लाईन, अहिल्यानगर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, खंडवा, इटारसी, भोपाळ, बीना, वीरांगना लक्ष्मीबाई झांसी, कानपूर सेंट्रल, लखनऊ, गोण्डा आणि बस्ती. संरचना: चार वातानुकूलित तृतीय श्रेणी, सहा शयनयान, सहा सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन.

८. गाडी क्र. ०१४४९ पुणे – दानापूर विशेष पुणे येथून १५.३० वाजता सुटेल. थांबे: दौंड कॉर्ड लाईन, अहिल्यानगर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, इटारसी, जबलपूर, सतना, प्रयागराज छवकी, पं. दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर आणि आरा.

संरचना: चार वातानुकूलित तृतीय श्रेणी, सहा शयनयान, सहा सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन.

९. गाडी क्र. ०१४९३ पुणे – हजरत निजामुद्दीन विशेष पुणे येथून १७.३० वाजता सुटेल. थांबे: लोणावळा, कल्याण, भिवंडी रोड, वसई रोड, पालघर, वलसाड, सूरत, वडोदरा जंक्शन, रतलाम, शामगढ, भवानी मंडी, रामगंज मंडी, कोटा, सवाई माधोपुर, गंगापूर सिटी, भरतपूर जंक्शन आणि मथुरा. संरचना: सोळा वातानुकूलित तृतीय श्रेणी आणि दोन जनरेटर.

१०. गाडी क्र. ०१४८१ पुणे – दानापूर विशेष पुणे येथून १९.५५ वाजता सुटेल. थांबे: दौंड कॉर्ड लाईन, अहिल्यानगर, कोपरगाव, मनमाड, जळगाव, भुसावळ, इटारसी, भोपाळ, बीना, वीरांगना लक्ष्मीबाई झांसी, ओरई, गोविंदपुरी, फतेहपूर, प्रयागराज, पं. दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर आणि आरा. संरचना: दोन वातानुकूलित द्वितीय श्रेणी, आठ वातानुकूलित तृतीय श्रेणी, सहा सामान्य द्वितीय श्रेणी, एक सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन आणि एक जनरेटर.

११. गाडी क्र. ०१४०९ पुणे – नागपूर विशेष पुणे येथून २०.३० वाजता सुटेल. थांबे: दौंड कॉर्ड लाईन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मुरटीजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा. संरचना: एक वातानुकूलित द्वितीय श्रेणी, अकरा शयनयान, सात सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन.

१२. गाडी क्र. ०१७५२ हडपसर – रीवा विशेष हडपसर येथून ०६.४० वाजता सुटेल. थांबे: दौंड कॉर्ड लाईन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, खंडवा, हरदा, इटारसी, पिपरिया, नरसिंहपूर, जबलपूर, कटनी, मैहर आणि सतना. संरचना: एक वातानुकूलित प्रथम श्रेणी कम वातानुकूलित द्वितीय श्रेणी संयुक्त, एक वातानुकूलित द्वितीय श्रेणी, चार वातानुकूलित तृतीय श्रेणी, बारा शयनयान, चार सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन.

१३. गाडी क्र. ०३२१४ हडपसर – दानापूर विशेष हडपसर येथून ०६.४५ वाजता सुटेल.



थांबे: दौंड कॉर्ड लाईन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, खंडवा, इटारसी, मदन महल, कटनी, मैहर, सतना, प्रयागराज छवकी, मिर्झापूर, पं. दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर आणि आरा. संरचना: आठ वातानुकूलित तृतीय श्रेणी इकॉनॉमी, आठ शयनयान, चार सामान्य द्वितीय श्रेणी, एक सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन आणि एक जनरेटर.

१४. गाडी क्र. ०१४३० हडपसर – लातूर विशेष हडपसर येथून १६.०५ वाजता सुटेल. थांबे: दौंड, जेऊर, कुर्डुवाडी, बारशी टाउन, धाराशिव, मुरूड आणि हरंगुळ. संरचना: एक वातानुकूलित प्रथम श्रेणी, दोन वातानुकूलित द्वितीय श्रेणी, चार वातानुकूलित तृतीय श्रेणी, आठ शयनयान, चार सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन.

१५. गाडी क्र. ०१४०७ खडकी – सांगानेर विशेष खडकी येथून ०९.४५ वाजता सुटेल. थांबे: लोणावळा, कल्याण, भिवंडी रोड, वसई रोड, पालघर, वापी, वलसाड, सूरत, अंकलेश्र्वर जंक्शन, वडोदरा, गोध्रा, रतलाम, भवानी मंडी, कोटा आणि सवाई माधोपुर. संरचना: चार वातानुकूलित तृतीय श्रेणी, सहा शयनयान, सहा सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन.

१६. गाडी क्र. ०४७२६ खडकी – हिसार विशेष खडकी येथून १७.०० वाजता सुटेल. थांबे: चिंचवड, लोणावळा, कल्याण, वसई रोड, वापी, वलसाड, सूरत, भरुच, वडोदरा जंक्शन, गोध्रा, रतलाम जंक्शन, नागदा जंक्शन, भवानी मंडी, कोटा, सवाई माधोपुर, दुर्गापुरा, जयपूर, रिंगस, सीकर, नवलगढ, झुंझुनू, चिडावा, लोहारू आणि सादुलपूर. संरचना: एक वातानुकूलित प्रथम श्रेणी, एक वातानुकूलित द्वितीय श्रेणी, पाच वातानुकूलित तृतीय श्रेणी , सात शयनयान, चार सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन.

१७. गाडी क्र. ०१४२१ दौंड – कलबुरगि अनारक्षित विशेष दौंड येथून ०५.०० वाजता सुटेल.

थांबे:भिगवण, परेवाडी, जेऊर, केम, कुर्डुवाडी, माढा, मोहोल, सोलापूर, टिकेकरवाडी, होतगी, अक्कलकोट रोड, बोरोटी, दुधाणी आणि गाणगापूर. संरचना: दहा सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान–सह–गार्ड कोच.

१८. गाडी क्र. ०१४५१ कोल्हापूर – कलबुर्गी विशेष कोल्हापूर येथून सकाळी ०६.१० वाजता सुटेल. थांबे: हाटकणंगले, जयसिंगपूर, मिरज, अरग, बेलांकी, सालगरे, कवठे महांकाळ, लंगरपेठ, ढालगाव, जाठ रोड, म्हसोबा डोंगरगाव, जावळे, वासूद, सांगोला, पंढरपूर, मोड्लिम्ब, कुर्डुवाडी, माढा, मोहोल, सोलापूर, अक्कलकोट रोड, दुधाणी आणि गाणगापूर रोड. संरचना: चार वातानुकूलित तृतीय श्रेणी, सहा शयनयान, सहा सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन. सोलापूर विभाग – २७.१०.२०२५ (कोल्हापूर, कलबुरगि आणि लातूर येथून सुटणाऱ्या विशेष गाड्यांचे तपशील) १९. गाडी क्र. ०१४२२ कलबुरगि – दौंड अनारक्षित विशेष कलबुर्गी येथून १६.१० वाजता सुटेल. थांबे: गाणगापूर, दुधाणी, बोरोटी, अक्कलकोट रोड, होतगी, टिकेकरवाडी, सोलापूर, मोहोल, माढा, कुर्डुवाडी, केम, जेऊर, परेवाडी आणि भिगवण. संरचना: दहा सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान–सह–गार्ड कोच.

२०. गाडी क्र. ०१४५२ कलबुरगि – कोल्हापूर विशेष कलबुरगि येथून १८.१० वाजता सुटेल. थांबे: गाणगापूर, दुधणी, अक्कलकोट रोड, सोलापूर, मोहोल, माढा, कुर्डुवाडी, पंढरपूर, सांगोला, वासूद, जावळे, म्हसोबाडोंगरगाव, जाठ रोड, ढालगाव, लंगरपेठ, कवठे महांकाळ, सालगरे, बेलांकी, आरग, मिरज, जयसिंगपूर आणि हातकणंगले संरचना: चार वातानुकूलित तृतीय श्रेणी, सहा शयनयान , सहा सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन. २१. गाडी क्र. ०१४२९ लातूर – हडपसर विशेष लातूर येथून ०९.३० वाजता सुटेल. थांबे: हरंगुळ, मुरूड, धाराशिव, बार्शी टाउन, कुर्डुवाडी, जेऊर आणि दौंड. संरचना: एक वातानुकूलित प्रथम श्रेणी, दोन वातानुकूलित द्वितीय श्रेणी, चार वातानुकूलित तृतीय श्रेणी, आठ शयनयान, चार सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन.

नागपूर विभाग – २७.१०.२०२५ (नागपूर येथून सुटणाऱ्या विशेष गाड्यांचे तपशील)

२२. गाडी क्र. ०१४०२ नागपूर – पुणे विशेष नागपूर येथून १६.१० वाजता सुटेल. थांबे: वर्धा, धामणगाव, बडनेरा, मुरटीजापूर, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहिल्यानगर आणि दौंड कॉर्ड लाईन. संरचना: एक वातानुकूलित द्वितीय श्रेणी, एक वातानुकूलित तृतीय श्रेणी, तेरा शयनयान, चार सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन.

२३. गाडी क्र. ०१२०१ नागपूर – हडपसर विशेष नागपूर येथून १९.४० वाजता सुटेल. थांबे: वर्धा, धामणगाव, बदनेरा, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहिल्यानगर, दौंड कॉर्ड लाईन आणि उरली. संरचना: चार वातानुकूलित तृतीय श्रेणी, सहा शयनयान आणि सहा सामान्य द्वितीय श्रेणी (यामध्ये दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन समाविष्ट). वरील विशेष, गाड्यांसाठी आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच संकेतस्थळावर www.irctc.co.in सुरू आहे. या विशेष, गाडीच्या थांब्यांवरील तपशीलवार वेळापत्रकासाठी कृपया http://www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा NTES App डाउनलोड करा. प्रवाशांना विनंती करण्यात येते की त्यांनी या विशेष, गाड्यांचा लाभ घ्यावा आणि गैरसोयी टाळण्यासाठी वैध तिकिटासह प्रवास करावा

# यशवंत नागरी सहकारी बँकेच्या धाराशिव येथील पाचव्या शाखेचे भव्य शुभारंभ

## ह.भ.प. वसंतराव नागदे यांच्या शुभहस्ते उदघाटन




**धाराशिव/प्रतिनिधी** : यशवंत नागरी सहकारी बँक लि. लातूरच्या धाराशिव येथील ५ व्या शाखेचे भव्य उद्घाटन बुधवार दि. २२ ऑक्टो रोजी जनता सहकारी बँक धाराशिव चे अध्यक्ष ह.भ.प. वसंतराव नागदे यांच्या शुभहस्ते व औसा विधानसभचे आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपावली पाडवा या शुभमुहूर्ताचे औचित्य साधून माणिक चौक, धाराशिव येथील भव्य वास्तूत करण्यात आला. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून सच्चिदानंद नाईकवाडी मा. जिल्हा उपनिबंधक सहकार आयुक्तालय पुणे तर प्रमुख पाहुणे प्रवीण फडणीस विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर हे उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्याच्या सुरुवातीस धनलक्ष्मीची प्रतिमा व यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीप प्रज्वलन करून व्यासपीठावरील मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे चेअरमन प्रा. सुहास पाचपुते यांनी केले. बँकेच्या आजपर्यंतच्या कार्यकाळाचा तसेच त्यांनी चेअरमन म्हणून मागील अडीच वर्षांमध्ये केलेल्या कार्याचा आढावा घेत एका शाखेचा पाच शाखेत विस्तार करत दुप्पट व्यवसाय वाढलेला असून ग्रॉस एनपीएचे प्रमाण २.२२ टक्के तर नेट एनपीए ० टक्के आहे असे सांगत बँकेने सहकार पुरस्कारासाठी उत्कृष्ठ मार्क घेतलेले आहेत. सहकार क्षेत्रातील दोन उत्कृष्ट आणि निष्कलंक अधिकारी नाईकवाडी व फडणीस यांचे बँक प्रगतीसाठी मिळालेले मार्गदर्शन अतिशय मोलाचे असून संचालक मंडळात प्राचार्य, वकील, प्राध्यापक, राजकारणी व महिलाबघिणी यांचा समावेश आहे याचाही आवर्जून उल्लेख केला. धाराशिव शहरातील सर्व नागरिकांना बँकेसोबत जोडण्याचे आवाहन करत पाचवी शाखा निश्चितच नावारूपाला येईल असा विश्वास चेअरमन प्रा. सुहास पाचपुते यांनी व्यक्त केला.

त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष सच्चिदानंद नाईकवाडी यांनी सहकारामध्ये काम करणाऱ्या बँकांना प्रशिक्षणाची आवश्यकता बोलून दाखवली. यशवंत बँकेचे चालू असलेले काम व चेअरमन पाचपुते यांची असलेली तळमळ व्यक्त केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रवीण फडणीस यांनी बँकेच्या माध्यमातून स्थानिक लोकांना रोजगार निर्माण व्हावा तसेच बँकेच्या संपूर्ण कार्याची माहिती देऊन विभागात काटेकोर चालणारी बँक म्हणून लवकरच पुरस्कार प्राप्त होईल अशी ग्वाही त्यांनी दिली.

आ. अभिमन्यू पवार यांनी बँकेच्या संचालक मंडळाचे व कर्मचाऱ्यांचे ठेवी, कर्ज व शाखाविस्तार वाढवण्यासाठी केलेल्या कामाबद्दल कौतुक केले, बँकेची चालू असलेली प्रगती, काटकसर याची प्रचिती आणून दिली तसेच पुढील काळात ही बँक एक हजार कोटी ची असेल अशी ग्वाही व विश्वास व्यक्त केला आणि येणाऱ्या काळात यशवंत या नावासारखीच बँक मोठी व्हावी अशी अपेक्षाही व्यक्त केली. उद्घाटक ह.भ.प. वसंतराव नागदे यांनी सभासद, ठेवीदार आणि कर्मचारी यांना मोलाचे मार्गदर्शन दिले. बँक वाढवण्यासाठी ठेवी दैनंदिन वाढतात परंतु सामान्य माणसाला जलद कर्ज वाटप करावे अशा सूचनाही दिल्या.

याप्रसंगी व्हा. चेअरमन सूर्यभान पाटील, संचालक वसंतराव पाटील, राजेंद्र कोळगे, प्रा. राजकुमार जाधव, ॲड. सुनील शिंदे, चंद्रकांत साळुंके, विष्णुपंत साठे, सुरेश राठोड, ॲड. राहुल विहिरे, प्रा. धर्मराज तांदुळजेकर, ॲड. आदिमाया गवारे, सुजाता कदम, तज्ञसंचालक परीक्षित पवार, ॲड. व्यंकटराव गुंड, नितीन काळे, विजय बारकुल, नारायण नन्नवरे, पिराजी मंजुळे, ॲड. खंडेराव चौरे, सीए सचिन शिंदे, नंदकूमार जाधव, मधुकर तावडे, बाळासाहेब जाधव, विक्रम पाटील तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी शाम कापसे, तुषार कातळे, शाखाधिकारी राम बिराजदार, नारायण काकडे, रामेश्वर इंगळे, परमेश्वर जाधव, शिवाजी सूर्यवंशी, बँकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी, सभासद, खातेदार, प्रतिष्ठीत नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# वडार समाजाला एसटी ब आरक्षण द्या- मुख्यमंत्र्यांना निवेदन

**लातूर/प्रतिनिधी** : वडार जमातीला अनुसूचित जमाती (एसटी ब) प्रवर्गात आरक्षण मिळावे, या मुख्य मागणीसाठी लातूर जिल्हा सकल वडार समाजाच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. अन्यथा येणाऱ्या काळात तीव्र आंदोलनाचा इशाराही दिला आहे.



वडार समाजाने अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेपणाचा सामना केला असून, त्यांना अद्यापही मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळालेली नाही. त्यामुळे त्यांना एसटी ब आरक्षणात समाविष्ट करून न्याय मिळावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी श्रीकांत मुद्दे म्हणाले की, वडार समाज एसटी प्रवर्गाचे निकष पूर्ण करत असूनही स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतरही वडार समाजाला घटनात्मक आरक्षण नाही, ही फार मोठी शोकांतिका पुरोगामी म्हणवल्या जाणाऱ्या महाराष्ट्राची झाली आहे. वडार समाजाची पारंपरिक जीवनशैली, व्यवसाय, राहणीमान, व शिक्षणाची पातळी ही अनुसूचित जमातींप्रमाणेच असून, शासनाने याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. तसेच वडार जमातीला भारतातील वेगवेगळ्या राज्यात घटनात्मक आरक्षण आहे. मात्र महाराष्ट्रात वडार जमातीवरती अन्यायकारक () विमुक्त–भटका प्रवर्ग लादण्यात आला आहे. यावेळी लातूर जिल्हा सकल वडार समाजाच्या वतीने वडार जमातीला एसटी ब प्रवर्गात आरक्षण मिळाले पाहिजे असे एकमुखाने मागणी करण्यात आली.

याप्रसंगी अर्जुन धोत्रे सर, बाबुराव शेल्हाळे, श्रीकांत मुद्दे, व्यंकट जाधव, प्रा.संजय शिंदे, रमाकांत इरकल, प्रा.तिमन्ना माने, गोविंद धोत्रे, विलास धोत्रे, सूर्यकांत मुद्दे, सोनबा मुद्दे, राजेंद्र भांडेकर, राजेंद्र जाधव,शंकर विटकर, राजू भांडेकर आदी वडार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# लातुरात १३ व्या राज्यस्तरीय वीरशैव लिंगायत वधू - वर परिचय मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद




**लातूर/प्रतिनिधी :** वीरशैव लिंगायत समाज बांधव लातूर तर्फे लातुरात रविवारी ( दि. २६ ऑक्टो. ) आयोजित करण्यात आलेल्या १३ व्या राज्यस्तरीय वीरशैव लिंगायत वधू - वर परिचय मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्याच्या कानाकोपऱ्यातून उप वधू - वर - त्यांच्या पालकांनी मोठ्या संख्येने मेळाव्यात आपली उपस्थिती नोंदवून मेळावा यशस्वी करण्याकामी संयोजकांना सहकार्य केले.

हा मेळावा वीरशैव समाज सांस्कृतिक भवनमध्ये पार पडला. मागच्या सलग १३ वर्षांपासून वीरशैव लिंगायत समाज बांधव लातूरच्या वतीने अशा प्रकारचा वधू - वर परिचय मेळावा आयोजित करण्यात येतो. या मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे मेळाव्यात वधू वरांची नाव नोंदणी करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही. पूर्णतः निःशुल्क होणाऱ्या या मेळाव्यामुळे वीरशैव समाज बांधवांच्या समाज सेवेचा हा आगळावेगळा उपक्रम संपूर्ण राज्यात नावलौकिकास पात्र ठरला आहे. या मेळाव्याचे उदघाटन अहमदपूरच्या वीर मठ संस्थानचे पिठाधिकारी राजेश्वर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज, खा. डॉ. शिवाजी काळगे, प्रा. मनोहर धोंडे, भाजप नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे हे होते. मंचावर बसवराज धाराशिवे, बाबासाहेब कोरे, राजाभाऊ हालकुडे, बालाजी पिंपळे, सुनील भिमपुरे, गुरुनाथ मगे यांची उपस्थिती होती.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी वधू - वर परिचय मेळाव्याच्या माध्यमातून समाज एकत्रित येऊन एकाच छताखाली अनेकांच्या गाठी - भेटीही होतात. अशा प्रकारच्या मेळाव्याची आजमितीस समाजाला नितांत आवश्यकता असल्याचे सांगितले. मेळाव्यात उपस्थित राहणाऱ्या सर्वच वधू वरांचे विवाह एकाचवेळी जुळून येत नसले तरी विखुरलेल्या समाजाला एकत्रित आणण्याचे हे सर्वोत्तम माध्यम आहे, ही बाब नाकारून चालणार नाही. वीरशैव समाजाच्या हितासाठी स्थापन करण्यात आलेल्या वीरशैव महामंडळाला आवश्यक त्या प्रमाणात निधीची उपलब्धी होत नाही. समाजाच्या विकासासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलून या निधीत भरीव वाढ कारण्यासाठी प्रयत्नरत असल्याचे त्यांनी सांगितले. आज समाजात विवाह जुळले, व्यवस्थित पार पडले तरी घटस्फोटाचे प्रमाणही वाढल्याचे निदर्शनास येत आहेत. ही बाब कोणत्याही समाजासाठी चांगली नाही. त्याकरिता विवाहानंतर पती - पत्नीने परस्परांना समजून घेणेही तेवढेच महत्वाचे असते. एकमेकांना समजून घेतल्याशिवाय नात्यात प्रेम, आपुलकी निर्माण होऊ शकत नाही. एकमेकांसोबतचा संवादच सुखी संसारासाठी महत्वाचा असतो,असेही डॉ. चाकूरकर यांनी सांगितले.

खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी यावेळी बोलताना वीरशैव लिंगायत समाज बांधव लातूरच्या वतीने नियमितपणे आयोजित केल्या जाणाऱ्या वधू वर परिचय मेळाव्याच्या माध्यमातून समाज सेवेबरोबरच समाज संघटनाचे कामही तेवढ्याच तन्मयतेने केले जात असल्याचे सांगितले. चांगल्या विचाराने सगळी मंडळी एकत्रित आल्यास समाजही संघटित होऊन प्रगती साधू शकतो. आजचे युग सोशल मिडियाचे आहे. या सोशल मिडीयाचा उपयोगही चांगल्या कार्यासाठी करून घेण्याचा रवांनी प्रयत्न करावा असे सांगून खा. डॉ. काळगे यांनी या मेळाव्याच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल संयोजकांचे कौतुक केले. बसवराज धाराशिवे यांनी आपले विचार व्यक्त करतांना समाज बांधव म्हणून आपण वेगवेगळ्या ठिकाणी वास्तव्य करत असलो तरी समाज एकत्रित येण्यासाठी आणि आपलेपणाची भावना कायम राहण्यासाठी अशा प्रकारचे मेळावे नियमितपणे होणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

वीर मठ संस्थानचे पिठाधिकारी राजेश्वर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांनी आपल्या आशीर्वचनात वीरशैव धर्म इष्टलिंग आहे. आपण कोठेही असलो तरी आपले आचार विचारांपासून परावृत्त होता कामा नये असे सांगितले. वीरशैवच नव्हे तर सर्वच समाजातील मुलांवर सध्यस्थितीत चांगले संस्कृ होणे आवश्यक झाले आहे. संस्काराशिवाय जीवनाला काहीच अर्थ उरत नाही. जीवनामध्ये सुखी संसारालाही अनन्यसाधारण असे महत्व आहे. नवविवाहित जोडप्यांना सुखी संसाराची गणिते समजावून सांगावीत पण, माता - पित्यानी त्यांच्या संसारात अधिकची लुडबुड करू नये असा सल्लाही त्यांनी आपल्या आशीर्वचनातून उपस्थितांना दिला. अध्यक्षीय समारोपात प्रा. मनोहर धोंडे यांनी विनाशुल्क वधू वर परिचय मेळाव्याचे आयोजन ही काळाची गरज असल्याचे सांगितले. हा उपक्रम मागच्या १३ वर्षांपासून अविरतपणे राबविणाऱ्या वीरशैव समाज बांधव लातूरच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे. वीरशैव हा प्राचीन धर्म आहे, जात नाही. जो कपाळावर विभूती लावतो, लिंग धारण करतो, भगवान शंकराला मानतो तो वीरशैव आहे. आज आंतर जातीय विवाहाचे प्रमाणही वाढले आहे. पण आंतर जातीय विवाहामुळेही समाजात घटस्फोटाचे प्रमाण वाढत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. कोणाचीही श्रीमंती ही पैसा - मालमत्तेवर न मोजली जाता ती मुलांवर केल्या जाणाऱ्या संस्कारावर मोजली जाणे आज गरजेचे बनले आहे. मुलांवर चांगले संस्कृ असतील तरच भावी पिढी सशक्त, नैतिकतेला अनुसरून चालणारी घडणार आहे. त्याकरिता आई वडिलांनी मुला - मुलींवर चांगले संस्कृ करावेत अशी अपेक्षाही प्रा. धोंडे यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे प्रास्तविक, सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन मेळाव्याचे मार्गदर्शक उमाकांत कोरे यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या मेळाव्याच्या आयोजनामागची भूमिकाही सविस्तरपणे विशद केली. मागच्या १३ वर्षांपासून वीरशैव लिंगायत समाजाच्या हिताच्या दृष्टीने, उप वधू - वरांच्या विवाहासाठी पालकांना अधिकची पायपीट करायला लागू नये, एकाच छताखाली त्यांना हवी तशी एकापेक्षा अधिक स्थळे पाहता यावीत हा यामागचा मूळ उद्देश्य आहे. समाज बांधवाना कोणतीही आर्थिक झळ बसता कामा नये या उद्देशाने मेळाव्याच्या नाव नोंदणी साठी कोणत्याही प्रकारचे शुल्क न आकारण्याचा निर्णय सुरुवातीलाच घेतला. तो आजमितीपर्यंत पाळत सर्वांच्या सहकार्याच्या बळावर मेळावा आयोजित केला जत असल्याचेही उमाकांत कोरे यांनी सांगितले. या मेळाव्यात दोन हजारांहून अधिक वधू वरांची नोंदणी झाली.

मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी उमाकांत कोरे, अभिषेक ( तम्मा ) चौंडा, नागेश कानडे, बसवराज धाराशिवे, राजाभाऊ हालकुडे, दिलीप होनराव, पवनकुमार कल्याणी, बालाजी पिंपळे, बसवेश्वर हालकुडे, सुनील भिमपुरे, शिवराज बुरांडे, सतीश कानडे, विश्वनाथ राचट्टे, प्रशांत बोळेगावे, महेश कोळळे, वैभव विभुते, मल्लिकार्जुन पेद्दे, यांसह अनेकानी परिश्रम घेतले.

## एमपीएससी २०२६ चे वेळापत्रक जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून (एम पीएससी) २०२६ मध्ये घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. वेळापत्रकानुसार, ५ ते ९ मे रोजी महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा २०२५ होणार आहे. तर १६ मे रोजी स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२५, महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा २०२५ होणार आहे. या तिन्ही परीक्षांचा निकाल ऑगस्टमध्ये प्रसिद्ध होईल. १७ मे रोजी महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब सेवा संयुक्त मुख्य परीक्षा २०२५ होणार आहे, तर महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त मुख्य परीक्षा ७ जून रोजी घेण्यात येईल. दोन्ही निकाल सप्टेंबरमध्ये जाहीर होणार आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा ३१ मे रोजी होऊन ऑगस्टमध्ये निकाल जाहीर केला जाणार आहे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर आणि न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षेचा तपशील स्वतंत्रपणे जाहीर केला जाणार आहे.

# तिर्रट जुगार खेळणाऱ्या ०८ जणांवर गुन्हा दाखल

## २ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील अवैध धंदे, जुगार, व बेकायदेशीर कृत्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे यांच्या आदेशान्वये व अपर पोलीस अधीक्षक . मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सतत मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेकडून दिनांक २४/१०/२०२५ रोजी मौजे निटूर, ता. शिरूर अनंतपाळ येथील एका शेतावर छापा टाकून तिर्रट नावाचा जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या आठ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलीसाकडून समजलेली माहिती अशी की, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, निटूर ते राठोडा जाणाऱ्या रस्त्यावरील सिद्धेश्वर सोमवंशी यांच्या शेतातील पत्र्याच्या शेड मध्ये काही व्यक्ती तिर्रट नावाचा जुगार खेळत असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यावरून पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने दिनांक २४/१०/२०२५ रोजी स सदर ठिकाणी छापा टाकला.

छापेमारीदरम्यान तेथे उपस्थित आठ इसम जुगार खेळताना व खेळवताना आढळून आले. त्यांना ताब्यात घेऊन घटनास्थळावरून रोख रक्कम, मोबाईल, मोटरसायकल असा एकूण ०२ लाख ९५ हजार ६३० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर आरोपींविरुद्ध कलम १२(अ), महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

अटक आरोपींची नावे :

माधव, वय ३५ वर्षे, रा. हालकी, ता. निलंगा, जि. लातूर. संदीप , वय ३२ वर्षे, रा. निटूर, ता. निलंगा, जि. लातूर, वैभव, वय ३० वर्षे, रा. निटूर, ता. निलंगा, जि. लातूर, नरसिंग, वय ४२ वर्षे, रा. निटूर, ता. निलंगा, जि. लातूर, नागेश, वय २२ वर्षे, रा. निटूर, ता. निलंगा, जि. लातूर, शिवराज, वय ४० वर्षे, रा. निटूर, ता.निलंगा, जि. लातूर, आकाश, वय २५ वर्षे, रा. निटूर, ता. निलंगा, जि. लातूर, लक्ष्मण, वय ४५ वर्षे, रा. निटूर, ता. निलंगा, जि. लातूर वरील सर्व बेकायदेशीरपणे स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी तिर्रट जुगार खेळत व खेळवीत असताना आढळले. त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली असून, जप्त केलेला सर्व मुद्देमाल पुढील तपासासाठी जमा करण्यात आला आहे.

ही कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात पथकातील पोलीस अंमलदार साहेबराव हाके, रियाज सौदागर, अर्जुन रजपूत, मनोज खोसे, जमीर शेख यांनी केली आहे.

## प्रसिद्ध उद्योगपती कीर्ती उद्योगाचे चेअरमन अशोक भूतडा यांचा मजविप तर्फे सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील प्रसिद्ध उद्योगपती कीर्ती उद्योगाचे चेअरमन, शेतकऱ्यांच्या सोयाबीन उत्पादकांचे अर्थ दाते अशोक भूतडा यांचा मराठवाडा जनता विकास परिषदेच्यावतीने लातूर येथील अंबाजोगाई रोड वरील ओन्ली वन हॉटेलच्या सभागृहात जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी मराठवाडा जनता विकास परिषदेचे अध्यक्ष शिवाजीराव नरहरे सचिव पांडुरंग देडे, उपाध्यक्ष ॲड. शेखर हविले, ॲड. शिवहर उतके, माजी कोषागार अधिकारी भुसने आदी पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिवाळीनिमित्त प्रयाग निवासस्थानी शुभेच्छा देण्यासाठी नागरिकांची गर्दी





**लातूर/प्रतिनिधी :** दिपावलीच्या निमित्ताने लातूर ग्रामीण मतदार संघातील नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या दिपावली स्नेह मिलन कार्यक्रमास संपूर्ण मतदार संघासह जिल्हाभरातून आलेल्या सर्व स्तरातील नागरिकांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयाग निवासस्थानी मोठी गर्दी केली होती. यावेळी नागरिकांकडून करण्यात आलेल्या सत्काराचा आ. कराड यांनी आदरपूर्वक स्वीकार केला तर या कार्यक्रमास आलेल्या सर्वांना त्यांनी दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. यानिमित्ताने हजारो जणांनी स्नेहभोजनाचा लाभ घेतला.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात बहाद्दर मतदारांनी हुकूमशाही एकाधिकारशाही झुगारुन भाजपाच्या विजयाचा नवा इतिहास घडवून आणल्याने यावर्षीची दिवाळीला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. यंदा सततचा पाऊस आणि पूर परिस्थितीमुळे ओढावलेल्या संकटावर मात करत बळीराजासह सर्व नागरिकांनी दिवाळीचे स्वागत केले. लातूर ग्रामीण मतदार संघ हेच माझे कुटुंब समजून गेली अनेक वर्षानुवर्ष मतदारसंघात काम करणारे मतदारसंघातील नागरिकांच्या सुखदुःखात सहभागी होणारे अनेकांच्या न्याय हक्कासाठी सातत्याने लढा देणारे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी सर्व नागरिकासमवेत दिवाळी साजरी करता यावी संवाद साधता यावा यासाठी दि २५ आणि २५ ऑक्टोबर २०२५ रोजी दिपावली स्नेह मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयाग या निवासस्थानी आयोजित करण्यात आलेल्या दिपावली स्नेह मिलन या कार्यक्रमास संपूर्ण मतदार संघातील गावागावातील, वाडी वस्तीतील सर्व स्तरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. महिला भजनी मंडळाच्या भगिनी, लाडक्या बहिणी यांची संख्या लक्षणीय दिसून येत होती. त्याचबरोबर जिल्हाभरातील राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर आवर्जून उपस्थित होते. यावेळी नागरिकांकडून करण्यात आलेल्या सत्काराचा आ. रमेशआप्पा कराड यांनी आदरपूर्वक स्वीकार केला त्यांची अस्थिवायतपणे चौकशी केली. दिपावलीच्या निमित्ताने अनेक महिलांनी दिर्घायुष्यासाठी औक्षण केले तर कार्यक्रमास आलेल्या सर्वांना त्यांनी दिपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर संत गोपाळ बुवा महाराज साखर कारखान्याचे चेअरमन राजेशजी कराड आणि युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड यांनी आलेल्या प्रत्येक नागरिकांचे स्वागत केले. या कार्यक्रमात आयोजित करण्यात आलेल्या स्नेहभोजनाचा हजारो जणांनी आस्वाद घेतला.

आ. रमेशआप्पा कराड यांनी आयोजित केलेल्या दिपावली स्नेह मिलन कार्यक्रमास जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, आ. अभिमन्यू पवार, रस्ते विकास महामंडळाचे अनिल गायकवाड, माजी खासदार सुनील गायकवाड, गोविंदांना केंद्रे, शिवाजीराव कव्हेकर, विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, नाथसिंह देशमुख, दिलीपराव देशमुख, बब्रुवान खंदाडे, शैलेश लाहोटी, अजित पाटील कव्हेकर, राहुल केंद्रे, त्र्यंबक आबा गुट्टे, प्रा संजय शिंदे, जगदीश कुलकर्णी, नवनाथ भोसले, भागवत सोट, उत्तरा कलबुर्गे, अविनाश कोळी, गुरुनाथ मग्गे, गुंडाप्पा पाटील, सुभाष जाधव, धर्मपाल देवशेटे, बसवराज रोडगे, राजकुमार कलमे, काकासाहेब मोरे, संजय अग्रवाल, बापूराव राठोड, सुधाकर भताने, अंकुश जाधव, इंग्रजीत केंद्रे, बन्सी भिसे, सतीश आंबेकर, महेंद्र गोडभरले, सुरज शिंदे, प्रताप पाटील, शरद दरेकर, उद्धव काळे, पद्माकर चिंचोलकर, वसंतराव दिघोळे, रोहिदास वाघमारे, माकने, सुनील उटगे, वैभव सापसोड, साहेबराव मुळे, राम जेवरे, हरी तुगावकर, अरुण समुद्रे, शहाजी पवार, जयप्रकाश दगडे, रघुनाथ केंद्रे, भीमाशंकर राजट्टे, बापूराव चामले, शिवसिंह सिसोदिया, रविकांत औसेकर, व्यंकटराव अनामे, श्याम वाघमारे, चंद्रसेन लोंढे, अशोक चिंचोले, संजय देशपांडे, रत्नाकर औसेकर, भास्कर लहाने, शहानुर बागवान, संभाजी वायाळ आदिनाथ मुळे, लक्ष्मण काळे, शिवाजीराव केंद्रे, बाबासाहेब घुले, पांडुरंग बालवाड, महेंद्र जाधवर, अशोक सावंत, अमर चव्हाण, बालाजी साळुंखे, रुपेश थोरमोठे, विजय काळे, सुनील होनराव, प्रवीण कस्तुरे, विवेक बाजपाई, राजपाल भंडे, गोविंद नरहारे महेश कणसे, श्वेता लोंढे, विष्णुदास मोहिते, ज्ञानेश्वर जुगल, गोपाळ पाटील, विश्वास कावळे, काशिनाथ ढगे, अमित रोडे, अनंत कणसे, लालासाहेब पाटील, बालाजी शिंदे, दीपक वांगस्कर, चंद्रकांत वागस्कर, राजकिरण साठे, अनिल भिसे, दशरथ सरवदे, अच्युत कातळे, दत्ता सरवदे, विजय चव्हाण, रवींद्र पाटील, चंद्रकांत कातळे, उज्वल कांबळे, राम मोरे, ज्ञानोबा भिसे, संपत कराड, लक्ष्मण नागिमे, महादेव मुळे, गुणवंत करंडे, अक्षय भोसले, राम बंडापल्ले, सचिन सवई, सुधाकर काळे, विजय गंभीरे, संजय डोंगरे, भैरवनाथ पिसाळ, विनायक मगर, सतीश कात्रे, हनुमंत गव्हाणे, सुकेश भंडारे, भाऊसाहेब गुडबिले, सिद्धेश्वर मामडगे, रमाकांत फुलारी, महेश गाडे, फुलचंद अंधारे, राजकुमार आलापुरे, दिनकर राठोड, उत्तम चव्हाण, अमृतेश्वर स्वामी, गणेश राठोड, माधव घुले, नामदेव बोबडे, आदिनाथ मुळे, शंकर चव्हाण, ललिता कांबळे, अनुसया फड, लता भोसले, शिला आचार्य, लक्ष्मण मुळे, संजय ठाकूर, योगीराज साखरे, ओम चव्हाण, संतोष चव्हाण, सुनील चेवले, धनराज शिंदे, श्रीमंत नागरगोजे, शिवमुर्ती उरगुंडे, नारायण राठोड, सोमनाथ वाघमारे, गोविंद नांदे, प्रशांत पाटील, बालाजी गवळी, शुभम खोशे, अहमद शेख, शरद शिंदे, संजय सावंत यांच्यासह लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील तसेच संपूर्ण जिल्हाभरातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर, महिला, पुरुष, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## घूस ..

शत्रूच्या वखारीमध्ये
सोडावीआपली घूस
नकाशा संपूर्ण पुरवा
म्हणा बिनधास्त घूस

संशय ना ये कुणाला
अशीचं लावावी फूस
रसदमिळावी वेळेवर
होऊ दे पार नासधूस

आपलीचंअसे प्यादी
मुळीना राहे मागमूस
अचूक माहितीसमग्र
निष्णात नेम जासूस

जबरीजरब बसवावी
नको रे पुनश्च भिडूस
अंगलट ना येवोकुणी
संदेश द्यायचा भिडूस

मुळापाशी खड्डे पाडा
उध्वस्त तरारला ऊस
तिकडे निघे प्रेतयात्रा
इकडे भरवावा ऊरुस

स्वताअडके असेकुठे
जाळी नकोस विणूस
विषण्ण होई मनअति
कुठे चाललायं माणूस

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.


## CHANGE OF NAME

**HERE IN THIS ADVERTISE**

I am declaring that I am changing My name Which was Earlier From **PUJARI SANJAYAKUMAR PRALHADRAO** TO **PUJARI SANJAY PRALHAD** Hence for this Declaration I will be known by this name and will use **PUJARI SANJAY PRALHAD** in future the same name will be used by my wife & children and all family.

Old Name : **PUJARI SANJAYAKUMAR PRALHADRAO**
New Name : **PUJARI SANJAY PRALHAD**
Address : **C/O Pralhad Pujari, At post : Jalkot, Dist : Oamanabad(Maharashtra-413 602.)**

## Change in name

I have Change my Name Biradar Hema Shivraj To Patil Sakshi Bhimashankar Henceforth this declaration and Will be Known by this Name and I will use Patil Sakshi Bhimashankar in future the same name will be used by my childrens, Wife & All Family

Old Name : Biradar Hema Shivraj
New Name: Patil Sakshi Bhimashankar
Add:- Ausa road, Aadarsh colony, Latur.





Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६